रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १२६
www.ramprahar.com
◆ रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

उरण बौद्धवाडा येथील आगीत तिघांचाही मृत्यू/२
खैराट येथील जंगलात तरुणाची आत्महत्या/५
नगर परिषद निवडणूक लढतींचे चित्र स्पष्ट/७

## विकासाबाबतच्या जागतिक निकषांचा पुनर्विचार व्हावा -पीएम मोदी



**जोहान्सबर्ग :** विकासाबाबतच्या जागतिक निकषांचा आमूलाग्र पुनर्विचार करायला हवा, असे आग्रही प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत केले. जी-२०ने प्रदीर्घ काळापासून जागतिक अर्थव्यवस्था आणि विकासाला चालना दिली आहे, मात्र सध्याच्या आराखड्यात मोठी लोकसंख्या ही संसाधनांपासून वंचित राहत आहे तसेच यात निसर्गाला ओरबाडून घेतले जाते याकडे पंतप्रधान मोदींनी लक्ष वेधले. नवी दिल्लीत झालेल्या शिखर परिषदेत घेतलेले काही ऐतिहासिक निर्णयांमध्ये वाटचाल सुरू असल्याचा उल्लेख त्यांनी केला. भारताच्या संस्कृतीत रूजलेला एकात्मिक मानवतावाद संपूर्ण जगाच्या साथीने प्रगतीवर भर देतो, असेही पंतप्रधानांनी सांगितले. त्यांनी या वेळी अमली पदार्थ आणि दहशतवादविरोधात प्रस्ताव मांडला.

# युतीच्या उमेदवारांचा एकदिलाने प्रचार करा

### मंत्री उदय सामंत यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

नगर परिषद निवडणुकीत रायगड जिल्ह्यात आपली युती आहे. युतीच्या सर्व नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी विकासाचा मुद्दा घेऊन उमेदवारांचा एकदिलाने प्रचार करावा, असे आवाहन राज्याचे उद्योग व मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी शनिवारी (दि. २२) अलिबाग येथे केले.

अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघातील अलिबाग, मुरूड, रोहा या तीन नगर परिषद निवडणुकीतील युतीच्या उमेदवारांची आढावा बैठक शनिवारी आमदार महेंद्र दळवी यांच्या निवास्थानी आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी मंत्री उदय सामंत युतीचे उमेदवार व कार्यकर्त्यांना



मार्गदशन करताना बोलत होते.

बैठकीस आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. आस्वाद पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील आदी मान्यवरांसह पदाधिकारी, युतीचे उमेदवार, कार्यकर्ते उपस्थित होते.

आपण एकत्र निवडणूक लढवतो तेव्हा विश्वास महत्त्वाचा असतो. आपल्यामध्ये विश्वासाचे सामर्थ्य असले पाहिजे. विश्वासानेच निवडणुकीला सामोरे जा. प्रचार करताना स्वतःसह सोबतच्या युतीच्या उमेदवारासाठीदेखील मत मागा. युतीचा विजय निश्चित आहे, असे मंत्री उदय सामंत म्हणाले.

विकास करण्याची ताकद स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आहे. काय काम करायचे हे माहित पाहिजे. जनतेला विश्वासात घेऊन काम करा. यश नक्की मिळेल, असा विश्वासही ना. सामंत यांनी व्यक्त केला.



# पेणचा चेहरामोहरा बदलण्याचे काम आम्ही केले -आमदार रविशेठ पाटील

### ■ बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांचा सत्कार

**पेण : प्रतिनिधी**

गेल्या १० वर्षात पेणचा चेहरामोहरा बदलण्याचे काम आम्ही केले. शहराच्या इतिहासात प्रथमच सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून उर्वरित १८ नगरसेवक व नगराध्यक्ष हेही बहुमताने निवडून येतील, असा आत्मविश्वास आमदार रविशेठ पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. या वेळी त्यांच्या हस्ते नगर परिषद निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या भाजप, राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीच्या सहा नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

पत्रकार परिषदेत विरोधकांचा खरपूस समाचार घेताना आमदार रविशेठ पाटील म्हणाले की, पेण पालिका निवडणुकीत उमेदवार शोधताना विरोधकांची दमछाक झाली आहे. बँकबुडव्यांना मत मागण्याचा हक्क नसून आधी जनतेचे पैसे द्या आणि नंतरच मत मागायला या. पाणीपुरवठा निधी पेण अर्बन बँकेत ठेवल्यामुळे आज फिल्टरेशन प्लांटचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, परंतु लवकरच हे काम हाती घेतले जाईल. यामुळे नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा होईल.

पेणचा चेहरामोहरा आम्ही बदलला. म्हणूनच अनेक ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. वाहतूक कोंडीवर पर्याय म्हणून रिंग रोडची निर्मिती करण्यात आली असून नाट्यगृहाची नव्याने निर्मिती करण्यात येणार असल्याचेही आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले.

माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या नेतृत्वाखाली शहरात सिमेंटचे रस्ते, गटार काँक्रीटीकरण अशी कामे होत असून आगामी काळात शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, छत्रपती संभाजी महाराज स्मारक अशी कामे प्रगतिप्रथावर आहेत. पेण शहरातील सुज्ञ नागरिक नक्कीच विचार करून आपले मत महायुतीच्या पारड्यात टाकून विरोधकांना त्यांची जागा दाखवतील, असे शेवटी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री बुधवारी पेणमध्ये



पेण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप, राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ राज्याचे मुख्यमंत्री तथा बुलंद तोफ देवेंद्र फडणवीस येत्या २६ नोव्हेंबर रोजी पेणमध्ये येणार आहेत. त्यांची जाहीर सभा नगर परिषद मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य पसरले आहे.

# रायगडात १० नगराध्यक्षपदांसाठी ३४ उमेदवार

### नगरसेवकपदासाठी तब्बल ५७५ जण निवडणूक रिंगणात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १० नगराध्यक्षपदांसाठी ३४, तर नगरसेवकपदांसाठी ५७५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारी (दि. २१) संपल्याने नगर परिषद निवडणुकीचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यात चार पालिकांमध्ये थेट लढत होणार आहे. २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला मतमोजणी आहे.

रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या १० नगर परिषदांमध्ये निवडणूक होत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी नगराध्यक्षपदासाठी आठ जणांनी, तर नगरसेवकपदासाठी ९८ जणांनी भरलेले अर्ज मागे घेतले.

खोपोली नगरपालिकेच्या नगरसेवकपदासाठी ३१ जागांसाठी ११८ उमेदवार निवडणूक रिंगणात असणार आहेत. अलिबाग नगरपालिकेच्या १९ जागांसाठी ४२ उमेदवार निवडणूक लढणार आहेत. श्रीवर्धन पालिकेच्या २० जागांसाठी ६० उमेदवार, मुरूड-जंजिरा २० जागांसाठी ५८ उमेदवार, रोह्यात २० जागांसाठी ५१ उमेदवार, महाडमध्ये २० जागांसाठी ५३ उमेदवार, पेणमध्ये २४ जांगासठी ५२ उमेदवार, उरण २१ जागांसाठी ४९ उमेदवार, कर्जत २१ जागांसाठी ४६ उमेदवार, तर माथेरानमध्ये २० जागांसाठी ४६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

अलिबाग, रोहा, कर्जत आणि माथेरान नगरपालिकेत दुरंगी लढत होणार आहे. मुरूड जंजिरा आणि पेण नगरपालिकेमध्ये तिरंगी लढत आहे. श्रीवर्धन आणि उरण पालिकेत चौरंगी लढत, तर खोपोली आणि महाड या पालिकांमध्ये नगराध्यपदासाठी अनुक्रमे सात आणि पाच उमेदवार निवडणूक लढविणार आहेत.

उमेदवारी अर्ज माघारीनंतर पालिका निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून आता प्रचाराला वेग येणार आहे. उमेदवारांनी घरोघरी जाऊन प्रचार करण्यास सुरुवात केली आहे.

# शालेय विद्यार्थ्यांसाठी लवकरच एसटीची हेल्पलाईन सुरू होणार

**धाराशिव : प्रतिनिधी**



शालेय विद्यार्थ्यांसाठी राज्य परिवहन (एसटी) महामंडळ लवकरच हेल्पलाईन सुरू करत आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला शनिवारी (दि. २२) भेट दिल्यानंतर ते बोलत होते.

शाळा आणि घर या दरम्यान बस प्रवासात काही अडचण आल्यास, बस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द झाल्यास विद्यार्थ्यांना योग्य ती मदत मिळावी या उद्देशाने ही हेल्पलाईन सुरू केली जाईल तसेच ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे संपर्क क्रमांक संबंधित शाळा-महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांना देण्यात येतील, असेही मंत्री सरनाईक यांनी या वेळी सांगितले.

## निवडक

### ऑपरेशन सिंदूरचा नकाशा ‘इसिस’ला पाठवणारे दोघे ताब्यात

**रायपूर :** छत्तीसगडमधील दहशतवादविरोधी पथकाने रायपूर आणि भिलाई येथून दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. दहावी आणि अकरावीत शिकणारे हे दोन्ही उच्च माध्यमिक विद्यार्थी दहशतवादी संघटना ‘आयएसआयएस’ हँडलर्सच्या थेट संपर्कात होते. त्यांनी हँडलर्सना ऑपरेशन सिंदूर संबंधित नकाशाची एक क्लिपिंग (नमुना) पाठवली होती. एटीएसने त्यांच्यावर गुन्हा दाखल केला असून चौकशी सुरू आहे.

### न्यायमूर्ती सूर्यकांत उद्या घेणार सरन्यायाधीशपदाची शपथ

**नवी दिल्ली :** भारताचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत सोमवारी (दि. २४) शपथ घेणार आहेत. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या शपथविधी समारंभाला ब्राझीलसह सात देशांचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उपस्थित राहणार आहेत. भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या सरन्यायाधीशाच्या शपथविधी समारंभाला इतर देशांचे इतक्या मोठ्या संख्येने न्यायिक शिष्टमंडळ उपस्थित राहणार आहे.

# सर्वांनी एकसंध राहून परिसराचा विकास करूया -लोकनेते रामशेठ ठाकूर

### खारकोपर येथे अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

सर्वांनी एकसंध राहून सर्व प्रश्न सोडवून परिसराचा विकास करूया, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २१) खारकोपर येथे रस्त्याच्या कामाच्या भूमिपूजनावेळी केले.





पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील खारकोपर येथील अंतर्गत रस्त्याचे काम एमएमआरडीएच्या निधीमधून करण्यात येणार आहे. हे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नामुळे तसेच माजी उपरपंच विजय घरत आणि किशोर पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे मंजूर झाले आहे.

भूमिपूजन समारंभास भाजप नेते रविशेठ पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी उपसरपंच अमर म्हात्रे, अनंता ठाकूर, किशोर पाटील, अंकुश ठाकूर, निलेश खारकर, निकिता खारकर, सुनील ठाकूर आशिष म्हात्रे, मनोज घरत, धीरज ओवळेकर, वितेश म्हात्रे, गायकवाड गुरुजी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कोपर, शिवाजीनगर, शेलघरमधील ग्रामस्थ उपस्थित होते.



# भाजप नेते अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस उत्साहात

### समाजोपयोगी उपक्रमांमधून जपली बांधिलकी

**पनवेल :** माणुसकीचे नाते जपणारे, सर्व समाजघटकांना आपलेसे करणारे आणि सतत जनसामान्यांच्या समस्यांसाठी कटिबद्ध राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असणारे भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस शनिवारी (दि. २२) मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीची जपणूक करत साजरा करण्यात आला.

या निमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक तसेच विविध संस्था-संघटनांचे पदाधिकाऱ्यांनी अरुणशेठ भगत यांना शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# नाशिक, जळगाव, कोल्हापूर केंद्रांची प्राथमिक फेरी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर (सीकेटी) स्वायत्त महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे यंदा १२वे वर्ष आहे. या अंतर्गत राज्यातील प्राथमिक केंद्रांच्या प्राथमिक फेरीला प्रारंभ झाला असून नाशिक, जळगाव व कोल्हापूर या केंद्रांची प्राथमिक फेरी उत्साहात रंगली.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरतपणे पुढे चालावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ या स्पर्धेची वैशिष्ट्ये आहेत. स्पर्धेत नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे. गेल्या ११ वर्षांत स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले असून ती नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे.

नाशिक, जळगाव व कोल्हापूर या केंद्रांची प्राथमिक फेरी उत्साहात झाली. कोल्हापूर केंद्रामधील आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज नागठाणेच्या ‘सोयरीक’, राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरच्या ‘हाफवे’, तर नाशिक व जळगाव केंद्रातून वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान शाखा नागपूरच्या ‘वि.प्र.’ आणि अभिनय नाट्यकला लोंढे चाळीसगावच्या ‘गाईड’ या एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. परीक्षक प्रमोद शेलार व राजा अत्रे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, अमोल खेर, गणेश जगताप, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.

यानंतर पुणे, रायगड, मुंबई या केंद्रांची प्राथमिक फेरी होणार असून महाअंतिम फेरी ५, ६ व ७ डिसेंबरला पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होईल. अंतिम फेरीतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये, प्रमाणपत्र व मानाचा अटल करंडक तसेच कलाकारांना पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे.



# भीषण अपघातात चौघे ठार, १२ जखमी

**सोलापूर : प्रतिनिधी**

देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या क्रुझर जिपचा टायर फुटून झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू, तर १२ जण जखमी झाले. ही दुर्घटना हैदराबाद रस्त्यावरील चिवरी फाट्याजवळ शनिवारी (दि. २२) घडली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील ऊळेगाव येथील भाविक आणि त्यांचे पुणे येथील हडपसरचे नातेवाईक देवदर्शनासाठी क्रुझर जीपने नळदुर्गकडील खंडोबा मंदिराकडे निघाले होते. त्यांच्या जीपचे पुढील टायर फुटल्याने अपघात झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# कारची कंटेनरला धडक; दोघांचा मृत्यू, पाच जण जखमी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील भंगारपाडा येथे एक्सयुव्ही कारने कंटेनरला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघे ठार, तर पाच जण जखमी झाले आहेत.

हर्ष संतोष पाटील (वय २१, रा. नेरूळ) हा त्याच्या ताब्यातील काळ्या रंगाची एक्सयुव्ही ७०० (एमएच ४३ सीएम ८८४७) कार घेऊन जेएनपीए-पनवेल मार्गावरून येत होती. या कारच्या चालकाने भंगारपाडा येथे ब्रिजवर कंटेनरला पाठीमागून धडक दिली. या अपघातात हितेंद्र पाटील (वय २२, रा. करावे गाव) आणि श्रीनाथ चंद्रशेखर (वय २२, रा. नेरूळ) हे दोघे गंभीररित्या जखमी होऊन मृत्युमुखी पडले, तर चालक हर्ष पाटील याच्यासह पाच जण जखमी झाले आहेत. अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# भाजपचे ठाकरे बंधूंविरोधात आंदोलन

## अर्णव खैरे आत्महत्या प्रकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकल ट्रेनमध्ये चढताना हिंदीत बोलल्यानंतर तुला मराठी बोलता येत नाही का? यावरून झालेल्या वादानंतर १९ वर्षीय अर्णव खैरेने आत्महत्या केली. या विद्यार्थ्याला मराठी बोलता येत नाही का? मराठी बोलण्याची लाज वाटते का? असे विचारत मारहाण झाली होती. डोंबिवली ते ठाणेदरम्यान ही घटना घडली.

मारहाणीनंतर अर्णव मानसिक तणावात होता. याच तणावातून या विद्यार्थ्याने कल्याणमध्ये आपल्या घरी येऊन गळफास घेत आत्महत्या केली. यानंतर आता भाजपकडून ठाकरे बंधूंविरोधात सद्बुद्धि द्या म्हणत



आंदोलन करण्यात आले. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली.

मुंबईमध्ये ठाकरे बंधूंविरोधात भाजपकडून 'सद्बुद्धी द्या प्रार्थना आंदोलन' करण्यात आले. हे आंदोलन तोंडाला काळ्या फिती बांधून करण्यात आले. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाच्या बाजूला जमून आंदोनल करण्यात आले. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साठम, या वेळी कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रसाद लाड, आमदार अतुल भातखळकर, आमदार संजय उपाध्याय, भाजप युवा मोर्चा मुंबईचे अध्यक्ष तेजिंदर सिंह तिवाना जी, भाजप मुंबई सरचिटणीस, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. भाषा ही संपर्काचे माध्यम आहे संघर्षाचे नाही असे फलक या वेळी हातामध्ये होते.

अमित साटम म्हणाले की, भाषा भाषांमध्ये वाद काही पक्ष करत आहेत. यामध्ये मराठी तरुणाला जीव गमवावा लागला. संपलेलं राजकारण आपलं सुरू राहावं यासाठी भाषावाद, प्रांतवाद करत आहेत. काही पक्ष काही नेते हे राजकारण करत आहेत. त्यांना सुबुद्धी देवो यासाठी आम्ही येथे एकत्र आलो आहोत. माणसाने माणसाला माणसासम वागू द्या. बाळासाहेब ठाकरे स्मृती स्थळावरुन या राजकीय पक्षांना आणि नेत्यांना सुबुद्धी द्यावी, असे सांगितल्याचे ते म्हणाले. माणसाने माणसाला माणसासम वागू द्या, असे साटम म्हणाले.

अशा राजकीय प्रवृत्ती आणि व्यक्तींना सद्बुद्धी प्राप्त व्हावी, यासाठी आज हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळी, मुंबई भारतीय जनता पार्टीतर्फे 'सद्बुद्धी द्या' ही प्रार्थना आयोजित करण्यात आली.

## उरण बौद्धवाडा येथील आगीत तिघांचाही मृत्यू

**उरण : बातमीदार**

उरण शहरातील बौद्धवाडा येथील आगीत लागलेल्या घटनेत होरपळून एकाच कुटुंबातील तीन व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. उरणच्या बौद्धवाडा परिसरात १० नोव्हेंबर २०२५ रोजी मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातील तिन्ही सदस्यांचा मृत्यू झाल्याने शहरावर शोककळा पसरली आहे.

नगरपालिका कर्मचारी रमेश शंकर कांबळे, पत्नी रजनी आणि मुलगी निकिता तिघेही गंभीर जखमी झाले होते, मात्र सलग उपचारांनंतर ११ नोव्हेंबर, १४ नोव्हेंबर आणि १९ नोव्हेंबर २०२५ रोजी तिघांनीही अखेरचा श्वास घेतला आहे. या घटनेमुळे उरणमध्ये सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

उरण शहरातील भाजी मार्केट जवळ असलेल्या मासळी मार्केटच्या मागील बाजूस असलेल्या कांबळे कुटुंबाच्या घरात मध्यरात्री अचानक आग भडकली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे प्राथमिकदृष्ट्या सांगितले जात असले तरी स्थानिक ग्रामस्थांनी या प्रकरणामागे संशयास्पद बाबी असल्याचे सांगत घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. ही साधी आग नाही; पोलिसांनी सखोल तपास करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या आगीच्या घटनेनंतर उरणमध्ये भीती व संतापाचे वातावरण पसरले असून पोलिसांनी तातडीने व्यापक तपास सुरू करून सत्य पुढे आणावे, अशी मागणी नागरीकांनी केली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. उरण, पनवेल नवी मुंबई परिसरात आगीच्या घटना सतत घडत असून यावर वेळीच उपाय योजना करणे गरजेचे आहे.

## नेरूळच्या रुग्णालयात अत्याधुनिक प्रयोगशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या नेरूळ येथील माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालयामध्ये अत्याधुनिक मायक्रोबायलॉजी प्रयोगशाळा स्थापित करण्यात आली आहे. ही प्रयोगशाळा उभारणीसाठी मे. आदित्य बिर्ला फाऊंडेशन यांच्यामार्फत प्राईड इंडिया संस्थेच्या सहयोगाने रु.८० लक्ष इतका सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यात आला असून ही प्रयोगशाळा रुग्णांच्या क्लिनिकल व्यवस्थापनात आणि साथरोगाच्या अभ्यासात अत्यंत उपयोगी ठरणार आहे. या लॅबचे उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते झाले. या वेळी



आमदार मंदा म्हात्रे, आयुक्त कैलास शिंदे उपस्थित होते.

मायक्रोबायलॉजी लॅबमुळे रोगास कारणीभूत ठरणाऱ्या जीवाणू, विषाणू, बुरशी, परजीवी यासारख्या सूक्ष्म जीवांची ओळख केली जाऊन संसर्गजन्य रोगाचे अचूक निदान केले जाते व योग्य प्रतिजैविक उपचार सुरू करणे शक्य होते. तसेच रोगाचे लवकर निदान करणे आणि त्याचा प्रसार थांबविणे शक्य होते. त्यामुळे विशेषत्वाने साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळविण्याकरिता मायक्रोबायलॉजी लॅब महत्वाची ठरते. पीजीआयएमएस च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रतिजैविके सुरू करण्यापूर्वी कल्चर सेंसिटिविटी टेस्ट्स करणे आवश्यक असते, तसेच इन्फेक्शन कंट्रोल कमिटीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कल्चर स्वॅब टेस्ट करणे शक्य होते.

याठिकाणी ब्लड कल्चर एंड सेंसिटिविटी टेस्ट्स, बॉडी फ्लुइड कल्चर अँड सेंसिटिविटी टेस्ट्स, स्पुटम कल्चर एंड सेंसिटिविटी टेस्ट्स, यूरिन कल्चर अँड सेंसिटिविटी टेस्ट्स, स्टूल कल्चर अँड सेंसिटिविटी टेस्ट्स, पस स्वॅब कल्चर सेंसिटिविटी टेस्ट्स, फंगल कल्चर, आरटी-पीसीआर टेस्ट्स फॉर कोविड अँड स्वाइन फ्लू, एलिसा टेस्ट फॉर एचआयव्ही, एचसीव्ही, एचबीएसएजी आदी विविध महत्त्वाच्या चाचण्या केल्या जातात.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पोस्टर सादरीकरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२१) रिसर्च अविष्कार समितीतर्फे मुंबई विद्यापीठांतर्गत होणाऱ्या रिसर्च आविष्कार कन्वेंशनच्याधर्तीवर महाविद्यालयीन स्तरावर वेगवेगळ्या विषयावर विद्यार्थ्यांचे पोस्टर सादरीकरण घेण्यात आले होते.

या उपक्रमात विज्ञान शाखेकडून एकूण १६ पोस्टर्स, तर वाणिज्य शाखेकडून १३ पोस्टर्स सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक, सामाजिक व पर्यावरणपूरक विषयांवर आकर्षक आणि माहितीपूर्ण पोस्टर्स तयार करून आपली सर्जनशीलता व कला कौशल्य प्रदर्शित केले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नयना साळवे यांनी केले तसेच त्यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, मांडणीचे आणि



विषयातील मौलिकतेचे कौतुक केले तसेच त्यांनी वेगवेगळ्या रिसर्च संदर्भात विद्यार्थ्यांना सूचना केल्या व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व रिसर्च आविष्कार कन्वेंशनसाठी शुभेच्छा दिल्या. या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा, समन्वयक रिसर्च अविष्कार समिती यांनी केले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. हे पोस्टर सादरीकरण महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले तसेच या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कल्पनाशक्तीला योग्य व्यासपीठ मिळाल्याची भावना व्यक्त करताना आयोजकांनी केली.

## पनवेलमध्ये आज शिक्षक पात्रता परीक्षा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत रविवार २३ नोव्हेंबर रोजी शिक्षक पात्रता परिक्षा घेण्यात येणार असून ही परिक्षा पनवेल शहरातील एकूण सहा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. २३ नोव्हेंबर रोजी चार केंद्रांवर सकाळ सत्र पेपर एक १०.३० ते दु. १ या वेळेत व सहा केंद्रांवर दुपार सत्र पेपर दोन दु.२.३० ते ५ या कालावधीत होणार आहेत. रायगड जिल्हयातुन पेपर क्रमांक एक साठी २ हजार ५१५ उमेदवार परिक्षा देणार असून पेपर दोन साठी ३ हजार ४५९ उमेदवार परिक्षा देणार आहेत.

ही परिक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी व परिक्षेतील गैरप्रकारांना पुर्णविराम देण्यासाठी शिक्षण विभागाने यंदा अधिक काटेकोर उपाययोजना राबविल्या आहेत. परिक्षा परिषदेकडून बायोमेट्रिक हजेरी, परिक्षार्थीच्या चेह-याची ओळख करण्यासाठी फेस स्कॅनिंग, सीसी टीव्ही, यांसह यंदा प्रथमच कनेक्ट व्हु व फोटो व्हु या दोन प्रणाली कार्यान्वित करणेत आल्या आहेत. एआय सीसीटीव्ही प्रत्येक केंद्रावर २४ तास रेकॉर्डींग करणारी एआय आधारीत सीसी टीव्ही यंत्रणा चेहरा व ध्वनीतरल विचलन टिपणार आहे. फोटो व्हु प्रणालीमुळे उमेदवाराचा मुळ फोटो स्क्रीनवर दिसेल. प्रत्यक्ष बसलेला विद्यार्थी व नोंदणीतील फोटो यातील फरक एआय तंत्रज्ञानाने त्वरीत शोधला जाईल.

कनेक्ट व्हु प्रणालीमुळे केंद्रप्रमुख व कंट्रोल रूम यांच्यात लाईव्ह कनेक्ट राहणार आहे. बायोमेट्रिक, फेस स्कॅनिंगमध्ये विद्यार्थ्यांच्या बोटांचे छाप व चेहरा स्कॅन केला जाणार आहे. परिक्षा केंद्रांना भेटी देण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. टीईटी परीक्षेचे जिल्हास्तरीय अध्यक्ष जिल्हाधिकारी रायगड आणि उपाध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अलिबाग आहेत.

## वाजेकर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात राज्यशास्त्र व IQAC च्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय संविधान आणि विकसित भारत २०४७ वरील आंतरराष्ट्रीय ई-परिषद: समावेशक, लोकशाही आणि शाश्वत राष्ट्र-उभारणीसाठी पाया असे या परिषदेचे शीर्षक व उपशीर्षक असून भारतीय राज्यघटनाचा अमृत महोत्सव व भारतीय स्वातंत्र्याचा आगामी शतक महोत्सव या अनुषंगाने विकसित भारत ही संकल्पना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप घोडके यांनी मांडली व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलमधील ज्येष्ठ सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व इतर सदस्यांनी मंजूर केली आहे.

ही आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्याकरिता प्रभारी प्राचार्य डॉ.अमोल ठक्कर, आयोजक डॉ संदीप घोडके व सर्व प्राध्यापक वृंद अविरत प्रयत्न करीत आहेत. बुधवारी (दि.२६) दिवसभर ऑनलाईन पद्धतीने चालणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन मुंबई व शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.अध्यक्ष डॉ देवानंद शिंदे यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता होत आहे.

परिषदेत स्थानिक, विद्यापीठ, राज्य ,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत तसेच या विविध स्तरातून आलेले शोध निबंध सादर केले जाणार आहेत, अशी माहिती परिषदेचे सहआयोजक डॉ राहुल पाटील यांनी दिली आहे.

## उरण महाविद्यालयात संविधान जागर कार्यशाळा



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय संविधान जागर अभियान कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षापूर्वी निमित्ताने विद्यार्थी प्रबोधन कार्यक्रमांतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले गेले. या कार्यशाळेत भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचा अर्थ विद्यार्थ्यांना सांगितला गेला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मा. निश्चय साक्षात साधना हे होते. त्यांनी भारतीय संविधानाच्या सरनाम्यातील धर्मनिरपेक्षता, लोकशाही, सामाजिक न्याय, बंधुता, समाजवाद, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विश्वास, संधीची व दर्जाची समानता, सामाजिक न्याय इत्यादी विषयावर सविस्तर मांडणी केली व विद्यार्थ्यांना संविधानाच्या अभ्यासाचे महत्त्व सांगितले.

या वेळी मा.सत्यवान ठाकूर यांनीही संविधानिक मूल्य आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे सर हे होते. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून राष्ट्रनिष्ठा प्रत्येक नागरिकांनी जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे व जात धर्माच्या बाहेर लोकशाही मार्गाने प्रत्येक पाऊल उचलले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन व उपस्थितांचे आभार जेष्ठ प्रा. डॉ.व्हि. एस. इंदुलकर यांनी व्यक्त केले. खऱ्या अर्थाने संविधानीक मूल्य आज समजली अशा भावना त्यांनी या वेळी व्यक्त केल्या.

कार्यक्रमात व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी प्रश्न-उत्तराच्या माध्यमातून वर्तमान स्थिती व संविधान याविषयी मनातील शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यशाळेत मा. वसंत मोहिते, मा, रमेश गोंधळी, डॉ. पराग कारुळकर, डॉ. हनुमंत जगताप, प्रा. रियाज पठाण इत्यादी मान्यवर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




**म्हसळा : रोहा सुतारवाडी येथे झालेल्या कार्यक्रमात शिवसेनेचे म्हसळा तालुका अध्यक्ष प्रसाद बोर्ले, विभाग प्रमुख नामदेव घुमकर, हेमंत कांबळे, इम्तियाज मुकादम, इम्रान काजी, हरी नाक्ती, पवन भोई अशा प्रमुख नेत्यांसह शिवसैनिकांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला. या कार्यक्रमाला मंत्री आदिती तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे यांचीही उपस्थिती लाभली.**

## नशामुक्त युवा, विकसित भारत अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

तरुणांमध्ये वाढत असलेली व्यसनाधीनता, दारू आणि ड्रग्जचे व्यसन केवळ तरुण पुरुष आणि महिलांमध्येच नाही तर शाळकरी मुलांमध्येही वेगाने वाढत आहे. त्यादृष्टीने बजरंग दलाने मंगळवारी सायंकाळी कोपरखैरणे व ऐरोली विभागात नाशमुक्ती युवा, विकसित भारत अभियान राबवले.

कोपरखैरणे गुलाब सन्स डेअरी चौक, कोपरखैरणे, कोपरखैरणे रेल्वे स्टेशन, ऐरोली डी मार्ट सर्कल येथे 'नशामुक्त युवा, विकसित भारत' हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून नशामुक्ती संदर्भात फलक हातात घेऊन जनजागृती करण्यात आली.

बजरंग दल नवी मुंबई जिल्हा संयोजक शंकर संगपाळ यांनी सांगितले की एका सर्वेक्षणानुसार, आज भारतात ६५ दशलक्षाहून अधिक ड्रग्ज वापरकर्ते आहेत. १० भारतीय शहरांच्या सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे



की शाळांमध्ये ड्रग्जचा वापर १३ वर्षांच्या वयापासूनच सुरू होतो. या संकटामुळे आपली तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे युवापिढीला यातून बाहेर काढून विकसित भारताचा महत्वाचा हिस्सा बनविण्यासाठी हा उपक्रम घेतल्याचे संगपाळ यांनी सांगितले.

विश्व हिंदू परिषद धर्माचार्य संपर्क प्रमुख प्रा.गणेश सुर्वे यांनी सांगितले की, आपण व्यायाम, योग, अध्यात्म आणि ज्ञानाद्वारे आपल्या तरुणांना या धोक्यापासून जागृत आणि संरक्षित केले पाहिजे असे ते म्हणाले.

बजरंग दल नवी मुंबई सहसंयोजक अरुण पाटील यांनी सांगितले की, शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस इत्यादी शैक्षणिक संस्थांशी संपर्क साधून आपल्याला जागरूकता निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. या अभियाना दरम्यान बजरंग दल नवी मुंबई जिल्हा सुरक्षा प्रमुख संजीव रावत, ऐरोली प्रखंड संयोजक निखिल घुडे, कुणाल पवार, यशराज शिंदे, कोपरखैरणे प्रखंड संयोजक सिद्धार्थ खैरनार, ओंकार कदम, संजय पोकळे, कुमार संगपाळ, शरद पवार, ऋषिकेश पार्टे, वनेश उतेकर, गौरव शिरसाट, शौर्य गुप्ता व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पनवेल वाहतूक शाखेने हरविलेली बॅग दिली मिळवून

**पनवेल : वार्ताहर**

एका महिलेची हरविलेली बॅग पनवेल वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे परत मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त करून आभार मानले आहेत.

वसुधा ओमकार जगे यांची बॅग खांदा कॉलनी येथे हरवले असता सदर महिला पनवेल वाहतूक शाखा कार्यालय येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना भेटून सदर बाबत समक्ष सांगितले. औदुंबर पाटील यांनी तात्काळ त्यांचे पीटर वाहन चालक केशव निकम व महिला पोलीस कर्मचारी योगिता पाटील यांना सदर बाबत माहिती देऊन सदर बॅग चा शोध घेणे कामी रवाना केले असता श्री निकम व महिला पोलीस योगिता पाटील यांनी सदर बॅगमध्ये असलेले मोबाईलचे लोकेशन काढून नवीन पनवेल कडे जाणार्या गुरुद्वारा जवळ स्कूल व्हॅन चालक यांना सापडले असता त्यांच्याकडून सदर बॅग व त्यामधील मौल्यवान



वस्तू अशा त्यांच्या प्रयत्नाने अल्प कालावधीत शोधून काढले.

बॅग मिळाल्यानंतर वसुधा ओंकार जगे यांच्या ताब्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांचे मार्गदर्शन खाली पनवेल वाहतूक शाखेचे स्टाफ सह त्यांच्या ताब्यात हरवलेली बॅग दिली पोलिसांनी दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता आणि कार्यतत्परता अनुकरणीय आहे. त्यांच्या या मदतनिधीमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होतो.

## दुखवटा

### अशोक काळे

**माणगाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ माणगाव माजी अध्यक्ष गणेश काळे यांचे पिताश्री कै. अशोक गोविंद काळे (वय ८२) यांचे रविवारी (दि.१६) माणगाव येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून, जावई, पाच नातवंडे असा परिवार आहे.



कै. अशोक काळे हे शांत व सय्यमी स्वभावाचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात ४० वर्ष नोकरी केली. सन १९९५ ते २००२ याकालावधीत त्यांनी माणगाव एसटी आगारात कंट्रोलर म्हणून काम करताना प्रवाशांना चांगली सेवा दिली. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले. कै. अशोक काळे यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२५) तर उत्तरकार्य विधी तेरावे शुक्रवारी (दि.२८) माणगाव येथे होणार आहे.

# पनवेलमध्ये रस्त्यांच्या कामांचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वस्पर्शी व्यक्तिमत्व असलेले भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस शनिवारी (दि.२२) विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. यानिमीत्त पनवेल तालुक्यातील सुकापूर, कोप्रोली आणि कोंडेले येथील रस्त्यांच्या कामांचे उद्घाटन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी झाले.

भाजपे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात येतो. त्यानुसार यंदाही पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकास





निधीमधून करण्यात आलेल्या विकास कामांचा उद्घाटन सोहळा अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमीत्त आयोजीत करण्यात आला होता. यावेळी १० लाख रुपयांच्या निधीमधून करण्यात आलेल्या सुकापूर देवद जोड रस्ता, १० रुपयांच्या निधीमधून करण्यात आलेला कोप्रोली येथील रस्ता आणि २० रुपयांच्या निधीमधून करण्यात आलेल्या कोंडले येथील रस्त्याचे उद्घाटन अरुणशेठ भगत यांच्याहस्ते झाले.

या कामांच्या शुभारंभावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, भाजपनेते एकनाथ देशेकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, रमेश पाटील, रोशन पाटील, ज्ञानेश्वर पाटील, आशिष कडू, महेश पाटील, सुनील पाटील, अंकुश पाटील, प्रकाश खैरे, राजेश पाटील, दिनेश खटके, खैरवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच भाग्यश्री कोलंबेकर, माजी सरपंच जनार्दन कोलंबेकर, रवींद्र पाटील, श्रीराम बडेकर, हरिचंद्र खंडागळे, अल्पेश खंडागळे, रामदास कातकरी, रामदास शिंदे, हनुमान खैरे, युवामोर्चा नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# कळंबोलीतून साडेपाच किलो गांजा केला जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली–रोडपाली लिंक रोडवरील एका ढाब्याजवळ, काही जण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अंमलदार ओमकार भालेराव यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने छापा मारून गांजा, मोबाईल व चार चाकी असा एकूण जवळपास १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तर यामध्ये चार आरोपींना अटक केली आहे.

नशामुक्त नवी मुंबई या अभियाना अंतर्गत अमली पदार्थ विरोधी कारवाईच्या सूचना, आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सर्वच विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार काम करत असताना मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अंमलदार ओमकार भालेराव यांना विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाली की, काही इसम हे कळंबोली परिसरात, रोडपाली लिंक रोड वरील डी डी धाब्याजवळ, गांजा विक्रीसाठी येणार आहेत.

मिळालेल्या माहितीच्या आधारावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक निरीक्षक महेश जाधव, सहाय्यक उपनिरीक्षक मंगेश वाट, पोलिस अमलदार नितीन जगताप, दिलीप ठाकूर व ओंकार भालेराव यांनी त्या ठिकाणी सापळा लावून धाड टाकली व चारही इसमांना ताब्यात घेतले. एकूण नऊ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

# कळंबोलीत रस्ते दुरूस्तीमुळे नागरिकांना दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कळंबोली प्रभागातील रस्ते दुरुस्तीची शनिवारी (दि.२२) अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पहाणी केली. या वेळी रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती लवकरात लवकर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.त्यानूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी आज कळंबोली प्रभागातील रस्त्यांची प्रत्यक्ष पहाणी केली. रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

या वेळी महापालिका अधिकारी, कनिष्ठ अभियंता,संबधित ठेकेदार व कर्मचारी उपस्थित होते. तसेच या वेळी अतिरिक्त आयुक्तांनी चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामाचा आढावा घेतला. सध्या पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील



रस्ते दुरूस्तीची कामे युध्द पातळीवर सुरू आहेत. शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीची कामे कनिष्ठ अभियंता करत आहेत.

सध्या कळंबोलीमध्ये सेक्टर १५, सेक्टर १३, खारघर मध्ये सेक्टर १२, सेक्टर ७, कोपरा ब्रीज, खुटूकबंधन गाव, तळोजा फेज१, डी मार्ट रोड ,नवीन पनवेल शिवा कॉम्प्लेक्स, कामोठे सेक्टर ३५ कैलास टॉवर याठिकाणी रस्ता दुरुस्तीची कामे वेगाने सुरू आहेत.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे एआय क्युरिऑसिटी कार्निव्हलमध्ये यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास आंतरशालेय एआय क्युरिऑसिटी कार्निव्हलमध्ये घवघवीत यश मिळाले आहे. २१ नोहेंबर २०२५ या दिवशी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये रितेश मोहन चव्हाण आणि आर्यन संतोष कदम यांना व्दितीय क्रमांक तर ताहेर हुजेफा चटाईवाला आणि रिदिमा राजेंद्र नाईक यांना तृतिय क्रमांक मिळाला आहे. त्यांना हा पुरस्कार संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते देण्यात आला. बक्षिसाच्या स्वरुपात चषक आणि प्रशस्ती पत्रक मिळाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्या निशा नायर यांनी त्यांचे कौतुक केले. त्यांना कम्प्युटर सायन्सच्या सहाय्यक शिक्षिका स्नेहल आवले यांचे मार्गदर्शन मिळाले.





# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची औद्योगिक भेट



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विज्ञान शाखेतर्फे शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर पुणे येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या भेटीत विद्यार्थ्यांनी दोन महत्त्वाच्या केंद्रांना भेट दिली, त्यामध्ये प्रामुख्याने श्री संत तुकाराम महाराज साखर कारखाना, मुळशी, पुणे व पिंपरी चिंचवड सायन्स सेंटर आणि प्लॅनेटोरियम, पुणे. या औद्योगिक भेटीमध्ये विज्ञान शाखेतील एकूण ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तसेच त्यांना प्रत्यक्ष उद्योग कार्यपद्धती, वैज्ञानिक प्रयोग तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख यांचा समृद्ध अनुभव मिळाला.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. नीलम लोहकरे रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले तसेच या उपक्रमासाठी सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन दिल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांचे मनःपूर्वक आभार मानले तसेच या भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी व प्राध्यापकांचेही मनःपूर्वक आभार मानले. ही औद्योगिक भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली असे आयोजकांनी नमूद केले.

# खारघर येथे फॅशन डिझाईन आणि ब्युटी पार्लर कोर्सला सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा क्षेत्रातील महिला सबलीकरणासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने फॅशन डिझाईन आणि ब्युटी पार्लर कोर्सला खारघर येथे शनिवारी सुरुवात झाली.

हा उपक्रम आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने, तसेच भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस विनोद घरत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे साकारण्यात आला आहे. या कोर्सचे आयोजन ओम ग्रामण्ये इन्स्टिट्यूट फॉर एज्युकेशनल एक्सलन्स, पुणे आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून कोर्सद्वारे महिलांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण मिळणार आहे.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



या कार्यक्रमावेळी विनोद घरत, चिटणीस उत्तर रायगड सचिन वास्कर, संतोष घरत, प्रभाग ३ अध्यक्ष जगदीश घरत, महिला उपअध्यक्ष सारिखा जाधव, महिला चिटणीस नूतन डांगळे, तालुका उपअध्यक्ष मनीषा तळवलकर, उपचिटणीस सुनीता देशमुख, सोनल लहा, नादिया कुंभार, पूनम घोरपडे, मीना भोसले, सुनीता बाचूळकर, रेश्मा बिबवे, वैशाली भालेराव, सृष्टी खवले, रेश्मा देवकर, प्रमोद तळवलकर, प्रकाश गोगले, संदीप डुंबरे, प्रवीण घरत, लुकमान शेख, रोशन घरत, सुजित कुमार, केशव गायकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विनोद घरत म्हणाले की, हा कोर्स तुमच्या आयुष्यात मोठे परिवर्तन घडविणारा ठरेल. पुढे कधीही कुठल्याही प्रकारची मदत लागली, तर एक भाऊ म्हणून मी कायम तुमच्या पाठीशी उभा राहीन. या उपक्रमामुळे महिलांना स्वावलंबन, रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकासाचे नवे दरवाजे उघडणार असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. स्थानिक महिलांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पुढील काही दिवसांत कोर्सला मोठी नोंदणी अपेक्षित आहे.

# गव्हाण विद्यालयाकडून चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे गव्हाण येथील जनरल बॉडी सदस्य आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष तसेच येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयाच्या वतीने त्यांचे सपत्निक अभिष्टचिंतन करण्यात आले.

प्रास्तविकात विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या यशस्वी कारकीर्दीचा थोडक्यात आढावा घेतला. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी, महिला मोर्चाच्या विभागीय अध्यक्षा ॲड.योगिता भगत, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य व



लाईफ मेंबर प्रमोद कोळी आदींनी मनोगत व्यक्त केले.

शिक्षक सागर रंधवे यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी अनेक मान्यवरांनी माननीय अरुणशेठ भगत यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, वामन म्हात्रे, नामदेव ठाकूर, किशोर पाटील, सुधीर ठाकूर, अंकुश ठाकूर, रघुनाथ देशमुख, सदानंद देशमुख, हेमंत ठाकूर, व्ही.के.ठाकूर, संतोष भगत, गव्हाण ग्रामपंचायतच्या माजी सदस्या ॲड.योगिता भगत व कामिनी कोळी, युवा नेते शुभ पाटील, हुसेन शेख, सुहास भगत, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे पर्यवेक्षक अरूण जोशी, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले, फुंडे विद्यालयाचे प्रतिनिधी राजू खेडकर तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यालयातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर करिअर क्लब च्या करिअर कॉर्नरचे उद्घाटन करण्यात आले. क्लबची विद्यार्थी प्रतिनिधी अभिलाषा म्हात्रे या विद्यार्थिनीने करिअर कॉर्नरची माहिती सांगितली.

# सीकेटी महाविद्यालयात क्रीडा व्यवस्थापन विषयावर चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयात प्लेसमेंट सेल विभाग आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स अँड मॅनेजमेंट (IISM), मुंबई यांच्या विशेष सहकार्याने बुधवारी (दि.१९) विद्यार्थ्यांसाठी 'क्रीडा व्यवस्थापनातील संधी' या विषयावर एक महत्त्वपूर्ण चर्चासत्र आयोजित केले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून IISM, मुंबई येथून आशिष कुमार पाधी (Outreach Associate) हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा व्यवस्थापन आणि स्पोर्ट्स सायन्स क्षेत्रात करिअरच्या



अनेक संधींची माहिती दिली.

या वेळी, स्पोर्ट्स मार्केटिंग , इव्हेंट मॅनेजमेंट आणि ॲथलीट मॅनेजमेंट यांसारख्या विविध उप–क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक अभ्यासक्रम, कौशल्ये आणि भविष्यातील संधी यावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या चर्चासत्राचे आयोजन सीकेटी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे एकूण १५० विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि प्रो. डॉ. बी. डी. अघाव (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, समन्वयक) यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वी पार पडला. प्रो. सत्यजित कांबळे (अध्यक्ष, प्लेसमेंट सेल), डॉ. व्ही. बी. नाईक (शारीरिक शिक्षण आणि क्रीडा संचालक), आरती कागवाडे (प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी), श्रुती कोळी (प्लेसमेंट समन्वयक) आणि प्लेसमेंट सेल समिती सदस्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना फळेवाटप

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


पनवेल तालुक्यातील भानघर येथील करुणेश्वर आणि चिंचवली येथील वात्सल्य वृद्धाश्रमामधील ज्येष्ठ नागरीकांसोबत भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी आपला वाढदिवस साजरा केला. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला जातो.

यानुसार शनिवारी (दि.२२) भाणघर येथील करुणेश्वर आणि चिंचवली येथील वात्सल्य वृद्धाश्रमामधील ज्येष्ठ नागरीकांना फळांचे वाटप करुन अरुणशेठ भगत





यांनी त्यांचे आर्शिवाद घेतले. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, भाजप नेते एकनाथ देशेकर, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, रमेश पाटील, रोशन पाटील, ज्ञानेश्वर पाटील, आशिष कडू, महेश पाटील, सुनील पाटील, अंकुश पाटील, प्रकाश खैरे, राजेश पाटील, दिनेश खटके, खैरवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच भाग्यश्री कोलंबेकर, माजी सरपंच जनार्दन कोलंबेकर, रमेश पाटील, शांताराम पोपेटा, रोशन पोपेटा, अमर शेळके, रवींद्र पाटील, श्रीराम बडेकर, हरिचंद्र खंडागळे, अल्पेश खंडागळे, रामदास कातकरी, रामदास शिंदे, हनुमान खैरे, युवामोर्चा नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम, शुभ पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.





# चित्रपट माध्यम व व्यवसायाचा महावृक्ष

## चित्रपती व्ही. शांताराम १२५वी जन्मशताब्दी

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

चित्रपटाचे जग आपण अनुभवू तसे, काही वास्तूंमध्ये प्रवेश करताच काही वेगळेपण जाणवते. त्या वास्तूच्या उभारणीतील महनीय व्यक्तीचे आजही तेथे अस्तित्व आहे असे जाणवते...

परळ येथील राजकमल कलामंदिरच्या वास्तूत अनेक वर्ष मी जातो आहे, यापुढेही जाणार आहे, पण जस जसे या स्टुडिओचे प्रवेशव्दार जवळजवळ येत जाते. चित्रपती व्ही. शांताराम यांच्या अलौकिक कर्तृत्वाची जणू छाया तेथे जाणवते. आजही ते या स्टुडिओत कुठे तरी आसपास आहेत, अथवा सेटवर एखाद्या प्रसंगाचे दिग्दर्शन करीत आहेत, अथवा या स्टुडिओतील कार्यालयात आहेत, स्टुडिओत फेरफटका मारत मिनी थिएटरपासून लायब्ररीपर्यंत सगळी कामे वेळेवर नि व्यवस्थित सुरू आहेत ना हे ते पाहताहेत असे वाटते...

चित्रपती व्ही. शांताराम यांची भारतीय चित्रपटसृष्टीतील वाटचाल दीर्घकालीन आणि अतिशय उल्लेखनीय अशीच. १८ नोव्हेबर रोजी त्यांचे १२५वे जन्मशताब्दी वर्ष सुरु झालं आहे, त्यानिमित्त हा विशेष फोकस. व्ही. शांताराम हे अगदी मूकपटाच्या काळापासून ते या माध्यम व व्यवसायात सक्रिय. १९२५ सालच्या महाराष्ट्र फिल्म कंपनी, कोल्हापूर निर्मित व बाबूराव पेंटर दिग्दर्शित सावकारी पाश या चित्रपटात व्ही.शांताराम यांनी हरबा ही व्यक्तीरेखा साकारली.

चित्रपट माध्यम व व्यवसायाच्या बदलत्या प्रवासाचे ते एक साक्षीदार आहेत. त्यांनी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांत, ९२ चित्रपट निर्माण केले आणि ५५ चित्रपट दिग्दर्शित केले तसेच तेच आपल्या चित्रपटाचे संकलक असत, त्यांना ते गरजेचे वाटे. पंचवीस चित्रपटात त्यांनी भूमिका साकारल्या.

व्ही.शांताराम हे चित्रपट माध्यम व व्यवसायाची अतिशय उत्तम जाण असलेले दिग्दर्शक. मनस्वी, जिद्दी, करारी आणि विलक्षण खंबीर. कामाला जणू वाघ. अखेरपर्यंत त्यांनी स्वप्न पाहिली ती भव्य निर्मितीची आणि त्यांना भारत सरकारच्या वतीने दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१ जून १९२९ रोजी पुण्यात प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. त्यात केशवराव धायबर, विष्णुपंत दामले, साहेबमामा फत्तेलाल आणि व्ही. शांताराम असे चार भागीदार होते. प्रभात फिल्म कंपनीत असताना व्ही. शांताराम यांनी सुरुवातीस पौराणिक चित्रपटही बनवले, पण १९३७ सालच्या 'कुंकू'पासून सामाजिक आशयाकडे ते वळले.

१९४२ साली व्ही.शांताराम यांनी प्रभातमधून बाहेर पडून राजकमल कलामंदिर स्टुडिओ उभारला, राजकमलची तुतारी फुंकली आणि आपली चित्रपट निर्मिती व दिग्दर्शन यांची यशस्वी वाटचाल सुरु ठेवली. राजकमल कलामंदिरची स्थापना केल्यावर मुंबईत आपला स्टुडिओ हवा म्हणून त्यांनी प्रयत्न केला आणि त्यांनी जे.बी.एच. वाडिया यांजकडून सेन्ट्रल स्टुडिओ विकत घेतला. १९४२ साली अडीच लाख रुपये ही प्रचंड मोठी रक्कम होती आणि त्याचा राजकमल कलामंदिर स्टुडिओ उभारला.

राजकमल कलामंदिरचा पहिला चित्रपट शकुंतला गोष्ट, नृत्य, रंग व संगीत यांना आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटात त्यांनी कायमच महत्त्व दिले. कृष्णधवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटातही त्यांचा आपला एक रंग असे आणि रंगीत चित्रपटात तर त्याचा प्रभावी वापर असे. त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील श्रेयनामावलीत (दो आँखे बारह हाथ या चित्रपटाची श्रेयनामावली आवर्जून पहा... त्यांच्या प्रत्येक चित्रपटातील श्रेयनामावलीत दिग्दर्शक दिसतो), आपल्या चित्रपटाची पोस्टर्स, त्याचे प्रदर्शन आणि मेन थिएटरमधील फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट यांना ते फारच महत्त्व देत. आपल्या शांताराम या चरित्रात त्यांनी याहीबाबतीत बरेच काही सांगितलंय (प्रेक्षक प्रतिसाद जाणून घेण्याबाबतची त्यांची असोशी नवीन पिढीतील सिनेमावाल्यांनीही शिकावी अशी आहे.) आपला चित्रपट कोणत्या चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे याबाबत ते जागरूक असत. त्याचे मेन थिएटर लिबर्टी असावे की ऑपेरा हाऊस की आणखी कोणते याचा ते बारकाईने अभ्यास करत आणि पहिल्याच दिवशी ते स्वतःच चित्रपटगृहावर जात आणि एखादा प्रसंग कंटाळवाणा वाटल्यास चक्क लगेचच कात्री लावत. जलबिन मछली नृत्यबिन बिजली या आपल्या चित्रपटाचा क्लायमॅक्स आवडला नाही म्हणून त्यांनी तो बदलला आणि रिशूटींग केले, तर तुफान और दिया या चित्रपटातील राजेंद्रकुमारच्या भूमिकेला बरीचशी काट मारली.

त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत संगीत व नृत्य हा एक स्वतंत्र मोठा विषय. मग ते गाणे नैन से नैन नाही मिला असो अथवा ये मालिक तेरे बंधे हम असो. आपल्या चित्रपटातील नृत्याची कलाकारांनी भरपूर तालीम (रिहर्सल) करावी याबाबत त्यांचा विलक्षण आग्रह. झनक झनक पायल बाजे या चित्रपटातील गीत संगीत व नृत्यासाठी गोपीकृष्ण व संध्या यांना महिनोन् महिने तालमी करायला लावल्या. सेटवर वेळेवर यायला हवे ही त्यांची शिस्त. पटकथा व संकलन या गोष्टीवर त्यांचा विलक्षण कटाक्ष असे. या माध्यम व व्यवसायाशी ते एकरूप एकनिष्ठ झालेले असे व्यक्तीमत्व.

मराठीतील पहिला बोलपट अयोध्येचा राजा (मुंबईत प्रदर्शित ६ फेब्रुवारी १९३२. गिरगावातील मॅजेस्टिक सिनेमागृहात हा चित्रपट प्रदर्शित झाला). या चित्रपटाची निर्मिती प्रभात फिल्म कंपनीची असून दिग्दर्शन व्ही.शांताराम यांचे आहे. म्हणजेच मूकपटाकडून बोलपटाकडे प्रवास करताना पहिला मराठी बोलपट व्ही. शांताराम यांचा आहे.

प्रभात फिल्म कंपनी याच निर्मिती संस्थेच्या व्ही.शांताराम यांचे संकलन व दिग्दर्शन असलेल्या सैरंध्री (१९३३) या चित्रपटाचीही काही वैशिष्ट्य आहेत. या चित्रपटाव्दारे भारतीय चित्रपटांच्या ध्वनिमुद्रिका सुरू झाल्या. या चित्रपटाच्या रसायन व आवृत्तीचे काम जर्मनी येथील उफा स्टुडिओत झाले आणि ध्वनिमुद्रिकाही तेथेच काढण्यात आल्या. अशा ध्वनिमुद्रिका बनवण्याची पहिली कल्पना शांतारामबापूंना सुचली. ते काळाच्या खूपच पुढचा विचार करत हेच यातून अधोरेखित होत आहे. सैरंध्री चित्रपट मराठीबरोबरच हिंदीतही निर्माण करण्यात आला होता.

व्ही.शांताराम दिग्दर्शित व संकलित माणूस (१९३९) या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटात सर्वप्रथम आपल्या देशातील चित्रपटातील पहिले बहुभाषिक गाणे आहे. मराठीबरोबरच उर्दू, गुजराती, पंजाबी, बंगाली व तमिळ भाषेतील एकेक कडवे होते. गाण्याचे बोल होते, प्रेमी प्रेम नगर को आये... लुटूया प्रेमाचा बाजार. हे गीत अनंत काणेकर यांचे तर संगीत मास्टर कृष्णराव यांचे.

व्ही.शांताराम दिग्दर्शित 'अमृत मंथन' (१९३४) या चित्रपटात आपल्याकडील चित्रपटात पहिला क्लोजअप पहायला मिळाला. झनक झनक पायल बाजे हा आपल्या देशातील पहिला टेक्निकलर चित्रपट. म्हैसूर (कर्नाटक) येथील वृंदावन गार्डन येथे या चित्रपटातील काही दृश्य चित्रीत केली. संगीतकार वसंत देसाई यांनी या चित्रपटासाठी फक्त भारतीय वाद्यांचाच उपयोग केला. या चित्रपटातील संध्याजींचे दीप नृत्य शास्त्रीय संगीतावर आधारित आहे. याच चित्रपटाच्या निर्मितीबाबत शिवाजी पार्क येथे व्ही.शांताराम यांच्या सत्काराचे आयोजन केले असता त्यात त्यांना चित्रपती व्ही.शांताराम असे गौरवण्यात आले आणि तीच त्यांची विशेष ओळख बनली. त्यांनी दिग्दर्शिलेला अमर भूपाळी बंगाली भाषेत डब करण्यात आला तसेच चैन्नईतही (तेव्हाचे मद्रास) लोकप्रिय ठरला.

व्ही.शांताराम दिग्दर्शित शकुंतला या चित्रपटाने १०४ आठवडे चालण्याचा विक्रम केला. त्यांच्या चौफेर व वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीत महत्त्वाचा चित्रपट म्हणजे 'पिंजरा' (१९७२). पुणे शहरात प्रभात थिएटरमध्ये हा चित्रपट ३१ मार्च १९७२ रोजी प्रदर्शित झाला, तर मुंबईत हा चित्रपट सेन्ट्रल, प्लाझा आणि भारतमाता येथे १४ एप्रिल १९७२ रोजी प्रदर्शित झाला आणि मग त्याची संपूर्ण महाराष्ट्रभर यशस्वी घोडदौड सुरू झाली आणि राज्यात नऊ शहरात खणखणीत रौप्यमहोत्सवी यश संपादले.

रसिकांना या पिंजरा मध्ये अडकणे आवडलं. आता 'पिंजरा' म्हणताक्षणीच रसिकांच्या एका पिढीला त्याची गोष्ट, गाणी आणि अगदी थीमनुसार पोस्टर असे सगळे आठवले असेल. त्या काळात हा चित्रपट म्हणजे प्रचंड मोठी क्रेझ निर्माण झाली होती. या 'पिंजरा'चे मध्यवर्ती कथासूत्र म्हणजे मराठी चित्रपटात कथा हीच स्टार असते असे म्हणतात त्याचाच प्रत्यय देणारे. याचे कथाबीज हॉलीवूडचा चित्रपट 'ब्लू एंजल' यावर आधारित आहे असे म्हटले गेले तरी त्याची महाराष्ट्रीय संस्कृती आणि मराठी चित्रपटाची वैशिष्ट्ये यानुसार ती गोष्ट सजवण्यात अथवा रंगवण्यात आली आहे हे विशेषच कौतुकाचे आहे आणि हेच या चित्रपटाचे सर्वात मोठे यश आहे. व्ही. शांताराम, अनंत माने आणि शंकर पाटील या तिघांनी मिळून या चित्रपटाच्या पटकथा आणि संवादवर भरपूर मेहनत घेतली आणि तो शंभर टक्के मराठी चित्रपट ठरला.

तोपर्यंत मराठी चित्रपटात तमाशा हा केंद्रस्थानी असलेले अनेक चित्रपट आले, पण हा अगदी वेगळा असा ठरला. याचे कारण म्हणजे व्ही. शांताराम यांची प्रभावी आणि कल्पक अशी हाताळणी. विशेषतः प्रतिकात्मक दृश्य हे आपले वैशिष्ट्य या चित्रपटात त्यांनी खुबीने वापरले. या चित्रपटाचे छायाचित्रण, संगीत आणि अभिनय याला राजकमल कलामंदिर टच होता. या चित्रपट निर्मिती संस्थेची प्रतिष्ठा या चित्रपटात पहायला मिळाली. तमाशाच्या फडाचे एका वेगळ्या कोनातून या चित्रपटात दर्शन घडते. म्हणून तर त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार 'पिंजरा'ला प्राप्त झाला.

व्ही. शांताराम हे आपल्या प्रत्येक चित्रपटातील गाणी कमालीची चांगली असावीत यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील असत. त्यांच्या दिग्दर्शनातील 'दो आँखें बारह हाथ ', 'नवरंग ', 'गीत गाया पत्थरोने', 'डॉ. कोटणीस की अमर कहानी, सेहरा या चित्रपटातील गाणी त्याचा प्रत्यय देतात. आपल्या एका चित्रपटात तब्बल दहा बारा गाणी असणे त्यांना फारसे गैर वाटत नसे. किंबहुना गाणी हे आपल्या भारतीय चित्रपटाचे जगावेगळं वैशिष्ट्य आहे यावर त्यांचा विश्वास असे. 'पिंजरा'मध्येही तब्बल दहा गाणी आहेत, एकेका गाण्याचे शब्द, मुखडा आणि चाल यासाठी व्ही. शांताराम प्रचंड आग्रही राहिले. या चित्रपटाची गीते जगदीश खेबूडकर यांची असून संगीत राम कदम यांचे आहे. खरंतर 'पिंजरा' पडद्यावर येईपर्यंत अनेक मराठी चित्रपटांसाठी ते एकत्र आले होते, एकमेकांच्या कामाची पद्धत माहीत होती. तरीही त्यांना या चित्रपटासाठी विशेष मेहनत घ्यावी लागली. व्ही. शांताराम हे कायमच आपल्या चित्रपटाच्या थीमनुसार श्रेयनामावली असावी यासाठी आग्रही असत. महत्त्वाचे म्हणजे यातील कोणतेही गाणे ऐकताना चित्रपटातील त्याचे स्थान डोळ्यासमोर येते हे विशेषच आहे. पार्श्वगायिका उषा मंगेशकर यांना या चित्रपटाने दिलेल्या संधीचे त्यांनी सोने केले तसेच लता मंगेशकर, सुधीर फडके, महेंद्र कपूर, जयवंत कुलकर्णी, वाघमारे यांनीही ही गाणी गायलीत. शहरापासून ग्रामीण भागात दूरवर तळागाळापर्यंत ही गाणी आणि या गाण्यांसह चित्रपट पोहचला. या चित्रपटाचे कला दिग्दर्शक बाबूराव जाधव आहेत, तर छायाचित्रण शिवाजी सावंत यांचे आहे. प्रत्येक बाबतीत व्ही. शांताराम यांचा टच दिसतोय.

विशेष म्हणजे डॉ. श्रीराम लागू यांचा हा पहिलाच चित्रपट आहे. तोपर्यंत ते मराठी रंगभूमीवर कार्यरत होते. 'नटसम्राट' या नाटकाचे प्रयोग अधिकाधिक उंचीवर नेत होते, पण व्ही. शांताराम यांनी त्यांना 'पिंजरा'तील मास्तर साकारातची खास विनंती केली. लागू यांनी व्ही. शांताराम यांचे अनेक चित्रपट पाहिले असल्याने त्यांनी होकार दिला आणि विशेष म्हणजे कोल्हापुरात शालिनी स्टुडिओत या चित्रपटाचे शूटिंग असताना आपले दृश्य चित्रीत झाले तरी ते व्ही. शांताराम यांची दिग्दर्शन कार्यशैली पाहत सेटवरच बसत. ते बरेच काही जाणून घेत. त्यात त्यांची नवीन गोष्टी शिकण्याची प्रवृत्ती दिसते आणि व्ही शांताराम यांचे प्रत्यक्षात सेटवर दिग्दर्शन अनुभवणे ही तर मोठीच सोनेरी संधी.

पूर्वीच्या अनेक कलाकृती अजरामर झाल्या त्यात हा घटक खूपच महत्त्वाचा! विशेष म्हणजे मुंबई महाराष्ट्रात दूरदर्शनचे आगमन होण्याच्या काही महिने अगोदरचा हा काळ होता आणि तेव्हा चित्रपटात गाणी पाहणे याशिवाय रेडिओ, लाऊडस्पीकर, वाद्यवृंद, इराणी हॉटेलमधील जुक्स बॉक्स अशी काही मोजकीच माध्यमे गाणी ऐकण्यासाठी असत, पण गाणीच अशी श्रवणीय की अशी मोजकीच माध्यमे असूनही ती लोकप्रिय झाली, ओठांवर आली आणि केवळ गाणी पाहण्यासाठी अनेक रसिकांनी 'पिंजरा' पुन्हा पुन्हा थिएटरमध्ये जाऊन पाहिला.

याशिवाय या चित्रपटात निळू फुले, वत्सला देशमुख, माणिकराज, गोविंद कुलकर्णी, कृष्णकांत दळवी, सरला येवलेकर, आबू, शोभा, भालचंद्र कुलकर्णी, बर्चीबहाद्दर इत्यादींच्याही भूमिका आहेत. या छोट्या छोट्या व्यक्तिरेखाही लक्षात राहतात.

या चित्रपटाच्या खणखणीत यशाने आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. या चित्रपटापूर्वी मराठीत १९६५ साली व्ही. शांताराम यांनीच मराठीतील पहिला रंगीत चित्रपट 'इये मराठीचिये नगरी' निर्माण केला, पण तरीही मराठीत कृष्ण धवल अर्थात ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रपटाचाच काळ सुरू राहिला. त्यानंतर व्ही. शांताराम यांनी 'पिंजरा' पुन्हा रंगीत चित्रपट निर्माण केला, तो सुपर हिट झाल्यावर हळूहळू का होईना पण मराठीत रंगीत चित्रपटाचे युग सुरू झाले. तरीही आठ दहा वर्षे मराठीत काही चित्रपट ब्लॅक ॲण्ड व्हाईट तर रंगीत येत राहिले, पण 'पिंजरा'च्या यशाने मराठी चित्रपटसृष्टीत रंगाचे महत्त्व पटू लागले सिद्ध झाले. हेही चित्रपती व्ही.शांताराम यांचे मराठी चित्रपटसृष्टीला मोठे देणं आहे.

...मराठी 'पिंजरा'ची व्ही. शांताराम यांनीच १९७३ साली हिंदीत पिंजडा या नावाने केलेली रिमेक मात्र रसिकांनी नाकारली. मुंबईत मेन थिएटर मराठा मंदिर चित्रपटगृहातून हा चित्रपट अवघ्या काही आठवड्यातून उतरला, प्लाझा चित्रपटगृहात मात्र काही काळ मुक्काम केला.


चित्रपती व्ही.शांताराम, अभिनय कोहिनूर दिलीपकुमार व स्वरयात्रा लता मंगेशकर एकत्र येणे हासुध्दा असाच एक महत्त्वपूर्ण योग. खर तर कोणत्याही चित्रपटासाठी हे तिघेही एकत्र येण्याचा योग कधीच आला नाही. लतादिदी व दिलीपकुमार हे मानलेले भाऊ व बहीण आहेत. लतादिदी दिलीपकुमारना राखी बांधत. १९९६ साली अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला रंगलेल्या लता मंगेशकर यांच्या भव्य संगीत कार्यक्रमास दिलीपकुमारची खास उपस्थिती होती. व्ही.शांताराम यांच्या राजकमल कलामंदिर या निर्मिती संस्थेच्या कोणत्याच चित्रपटात दिलीपकुमारने भूमिका साकारली नाही, मात्र दिलीपकुमारची भूमिका असणाऱ्या यश चोप्रा दिग्दर्शित 'मशाल' इत्यादी अनेक चित्रपटांचे राजकमलमध्ये चित्रीकरण होताना दिलीपकुमार व व्ही.शांताराम या दोन दिग्गजांची या स्टुडिओतील व्ही.शांताराम यांच्या कार्यालयात भेट होऊन गप्पा रंगत, तर लता मंगेशकर यांनी व्ही.शांताराम दिग्दर्शित 'झनक झनक पायल बाजे' (१९५५), 'दो आँखे बारह हाथ' (१९५७), 'सेहरा' (१९६३), 'पिंजरा' (१९७२) इत्यादी अनेक चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले आहे तसेच लता मंगेशकर यांनी निर्मिती असलेला व गुलजार दिग्दर्शित 'लेकिन' या चित्रपटाचा याच राजकमल कलामंदिरमध्ये दिदींच्या वाढदिवसानिमित्त २८ सप्टेंबर १९८७ रोजी अतिशय थाटात मुहूर्त झाला. आजही या मुहूर्ताचा भावनिक क्षण आठवतोय. विनोद खन्ना, डिंपल खन्ना व अमजद खान यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या लताजींच्या या चित्रपटाच्या मुहूर्ताला क्रिकेटर सुनील गावसकर याची खास उपस्थिती होती.

या तिघांच्या भिन्न स्वरूपातील भेटीगाठी वा आठवणी यांचा हा ट्रेलर... 'दो आँखे बारह हाथ'मधील जेलरची भूमिका दिलीपकुमारनेच करावी असा प्रयत्न पूर्ण होऊ न शकल्याने व्ही.शांताराम यांनीच ती साकारलीय असाही एक किस्सा प्रसिद्ध आहे, पण हे तिघेही दिग्गज एकत्र येण्याचा सुयोग एकदा मात्र आला. या तिघांनाही चित्रपट या माध्यम व व्यवसायाबद्दल कायमच विशेष आस्था असणे यात आश्चर्य नाही. तिघांकडेही या क्षेत्रातील दीर्घानुभव. या प्रत्येकाचे समाजात मानाचे स्थान व त्यांनीही समाजाला बरेच काही दिलेय. या तिघांचेही पडद्यापलिकडे जाऊन प्रेक्षकांशी भावनिक नाते जुळलंय. विविध स्तरावर त्याचा स्वीकार करता येईल. म्हणूनच तर हे तिघेही एकत्र येण्याचा हा क्षण विशेष मोलाचा....अरे हो, ज्या निमित्त हे तिघे एकत्र येण्याचा योग जुळून आला तो चित्रपटसृष्टीचा बंद अखेर १० नोव्हेंबर रोजी मिटला, पण एक चांगली आठवण देणारा ठरला.

चित्रपती व्ही.शांताराम यांच्या प्रगती पुस्तकात अशा अनेक अगणित सकारात्मक गोष्टी आहेत. त्यातील काहींवर हा फोकस्ड. आजही राजकमल कलामंदिर स्टुडिओत पाऊल टाकताच व्ही. शांताराम (जन्म १८ नोव्हेंबर १९०१. मृत्यू ३० ऑक्टोबर १९९०) यांचे अस्तित्व नक्कीच जाणवते. अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आलेल्या (त्यातील अनेक मानाचे पुरस्कार राजकमलमध्ये अतिशय व्यवस्थित मांडण्यात आले आहेत) या व्यक्तिमत्वाचे मोठेपण चित्रपटाच्या विशाल पडद्यासारखेच उत्तुंग आहे...

चित्रपती डॉ. व्ही. शांताराम यांचे १२५वे जयंती वर्ष १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरू झाले आहे. या १२५व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने डॉ. व्ही. शांताराम यांची कारकीर्द जिथे बहरली त्या कोल्हापूर, पुणे आणि मुंबई या शहरांमध्ये वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत.

# नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर



अभिनेते व निर्माते नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांचा आज स्मृतिदिन. १२ मार्च १८९१ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील नेवरे येथे चिंतामणराव यांचा जन्म झाला. त्यांचे वडील हे वर्तमानपत्र लेखक आणि वक्ते होते. चिंतामण कोल्हटकरांच्या वयाच्या सातव्या वर्षीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. लहानपणी अभ्यासात अधिक गती नसल्याचे पाहून काही वर्षे त्यांनी पिढीजात असलेली शेती केली. सातारा येथे 'तुकाराम' या नाटकात त्यांनी मंबाजीची भूमिका साकारून (१९०७) रंगभूमीवर प्रवेश केला. नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचं बोट धरून ते महाराष्ट्र नाटक मंडळीत आले आणि १९१८मध्ये दीनानाथ मंगेशकर, कृष्णराव कोल्हापुरे यांच्या समवेत स्थापन केलेल्या 'बळवंत संगीत नाटक मंडळी'पर्यंतचा साराच इतिहास मोठा संघर्षमय, रोमांचकारी आणि अद्भूत असाच आहे.

कोल्हटकर १९११मध्ये महाराष्ट्र नाटक मंडळीत दाखल झाले आणि पुढच्याच वर्षी ते भरत नाटक मंडळीत गेले. १९१४ साली ते किर्लोस्कर नाटक मंडळीत आले. तेथे त्यांना प्रसिद्धी मिळाली. १९१८मध्ये त्यांनी दीनानाथ मंगेशकरांच्या भागीदारीमध्ये बलवंत नाटक कंपनी काढली. त्यानंतर त्यांनी नाट्यक्षेत्रात अनेक प्रकारची कामे केली.

कोल्हटकरांनी भूमिका केलेली पुण्यप्रभाव, राजसंन्यास, भावबंधन ही नाटके खूप गाजली. वेड्यांचा बाजार हे राम गणेश गडकरी यांचे अपूर्ण नाटक त्यांनी पूर्ण केले. राम गणेश गडकरी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे, वीर वामनराव जोशी, अशा अनेक नामवंत नाटककारांकडून त्यांनी नाटके लिहून घेतली आणि मोठ्या दिमाखात रंगभूमीवर आणली. चिंतामणराव कोल्हटकर आणि मास्टर दीनानाथ मंगेशकर यांनी आपल्या बळवंत संगीत मंडळीतर्फे उत्तमोत्तम नाट्यकृती सादर केल्या आणि गद्य आणि पद्य यांचा अपूर्व साक्षात्कार रंगभूमीवर घडवला. १९३३च्या सुमारास मराठी संगीत रंगभूमीला प्रेक्षकांचा प्रतिसाद कमी झाला. तेव्हा चिंतामणरावांनी चित्रपटांत काम करायला सुरुवात केली. त्यांची वसंतसेना या चित्रपटातली शकाराची भूमिका गाजली.


चिंतामणराव कोल्हटकरांनी बळवंत संगीत मंडळीचे बळवंत पिक्चर्समध्ये रूपांतर केले. पण त्यांना या व्यवसायात प्रचंड खोट बसली. कोर्टकचेऱ्या, नामुष्की आणि पदरी आलेलं प्रचंड अपयश पाहून आणि आपल्याच कंपनीत नोकर म्हणून काम करावे लागण्यासारखी मानहानी झाल्याने ते चित्रपट व्यवसायातून बाहेर पडले आणि परत नाटकाकडे वळले. चिंतामणरावांनी पुढे त्यांनी गंगाधरपंत लोंढे यांच्या राजाराम संगीत मंडळीत प्रवेश केला आणि परत नाटकांतून कामे करायला सुरुवात केली.

पुढे ते मो. ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनमध्ये गेले. अखेरीस त्यांनी ललित कला कुंज नावाची स्वतःची नाटक मंडळी काढली. या कंपनीनेच पु. ल. देशपांडे यांना उदयास आणले. कोल्हटकरांनी मराठीबरोबरच हिंदी आणि उर्दू नाटकांतही भूमिका केल्या. चिंतामणरावांनी आपल्या आत्मचरित्राला बहुरूपी हे नाव दिले आहे. त्यांनी लिहिलेल्या माझे नाटककार या पुस्तकात तत्कालीन नाट्यलेखकांच्या व्यक्तिरेखा वर्णिल्या आहेत. त्यांनी लिहिलेले पुण्यावतार हे पाच-अंकी नाटक १९६६मध्ये मुंबईच्या आंतरनाट्य या संस्थेने रंगमंचावर आणले होते. जवळजवळ ५० वर्षे त्यांचा रंगभूमीवरील कलाकारांशी कधी नाटककार म्हणून, कधी नट म्हणून, तर कधी दिग्दर्शक म्हणून संबंध येत गेला.

विश्राम बेडेकर, पु.ल. देशपांडे, चंद्रकांत गोखले, वसंत शिंदे, शांता जोग हे सर्व चिंतामण कोल्हटकर यांचे नाट्यक्षेत्रातले शिष्य म्हणून पुढे नावारूपाला आले. १९४६ साली नगर येथे भरलेल्या ३५व्या आणि १९४९मध्ये कोल्हापूर येथे भरलेल्या ३६व्या नाट्यसंमेलनांचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या रंगभूमीच्या सेवेबद्दल राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदक देऊन भारत सरकारने त्यांचा सन्मान केला होता. चिंतामणराव यांचे २३ नोव्हेंबर १९५९ रोजी निधन झाले.

(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)

# नोबेल पारितोषिक विजेते वनस्पतीशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस



आधुनिक भारतीय विज्ञानातील पहिले वैज्ञानिक संशोधक म्हणून नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांचे नाव घेतले जाते. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीस बोस यांनी त्यांच्या योगदानाने देशाला विज्ञानाच्या जगात जागतिक स्तरावर आणले. भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र या विषयांना भारतीय संस्कृतीशी जोडण्याचे काम त्यांनी केले आहे. विज्ञान साहित्यात योगदान देताना सर्वसामान्यांनाही विज्ञानाची ओळख करून घेण्याची संधी मिळाली. त्यांना रेडिओ कम्युनिकेशनचे जनक म्हणून ओळखले जाते. आज त्यांचा स्मृतिदिन...

जगदीश चंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी ब्रिटीश राजवटीत असलेल्या पूर्व बंगालमधील मेमनसिंग येथील ररौली गावात झाला, जो आता बांगलादेशात आहे. त्यांचे प्रारंभिक शिक्षण त्यांच्या वडिलांनी स्थापन केलेल्या त्याच गावातील शाळेत झाले. लहानपणापासूनच बोस यांना निसर्गाच्या सानिध्यात राहण्याची खूप आवड होती. यानिमित्ताने त्यांची जीवशास्त्रातील आवड जागृत झाली. वयाच्या ११व्या वर्षी ते कलकत्त्याला आले आणि त्यांनी सेंट झेवियर्स शाळेत प्रवेश घेतला. यानंतर ते लंडनला वैद्यकीय शास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी गेले, परंतु प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी डॉक्टर होण्याचा आपला इरादा सोडला आणि केंब्रिज कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, जिथे त्यांनी भौतिकशास्त्राचा अभ्यास केला.

बोस १८८५मध्ये भारतात आल्यानंतर प्रेसिडेन्सी कॉलेज, कलकत्ता येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून शिकवू लागले. इंग्रजी प्राध्यापकांच्या तुलनेत भारतीय प्राध्यापकांच्या कमी पगाराला विरोध केल्याने त्यांनी तीन वर्षे विनावेतन अध्यापन केले, पण त्यांनी शिकवणे सोडले नाही. बोस यांचे काही विद्यार्थी जसे सतेंद्र नाथ बोस नंतर प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ बनले. बोस यांनी कॅस्कोग्राफ नावाच्या उपकरणाचा शोध लावला. ते परिसरातील विविध लहरी मोजू शकत होते. पुढे त्यांनी प्रयोगातून सिद्ध केले की झाडांमध्ये आणि वनस्पतींमध्ये जीवन असते. त्याच्या या शोधाचे जगभरात कौतुक झाले.

वैज्ञानिक विभागात असे मानले जाते की बोस यांच्या वायरलेस रेडिओसारख्या उपकरणातूनच रेडिओ विकसित केला गेला, पण स्वतःच्या नावावर पेटंट झाल्यामुळे रेडिओच्या शोधाचे श्रेय इटालियन शास्त्रज्ञ जी. मार्कोनी यांना जाते. बोस यांना बंगाली विज्ञान साहित्याचे जनक देखील म्हटले जाते. १८९६मध्ये बोस यांनी निरुद्देशर कथा लिहिली जी एक छोटी कथा होती, परंतु १९२१मध्ये त्यांच्या अभ्यक्त संकलनाचा भाग बनली. १९१७ मध्ये त्यांना नाइटहूड ही पदवी देण्यात आली, त्यानंतर बोस सर जगदीश चंद्र बोस म्हणून ओळखले जाऊ लागले. २३ नोव्हेंबर १९३७ रोजी वयाच्या ७८व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

# श्रीवर्धनमध्ये कचरा संकलन प्रक्रियेचा बोजवारा

## यंत्रणेवर वाढता ताण; नियमभंगामुळे घंटागाड्यांची दमछाक

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

शहरातील स्वच्छता राखण्यासाठी नगर परिषदेच्या चार घंटागाड्या दररोज सकाळ–संध्याकाळ शहरभर फेऱ्या मारत कचरा संकलन करतात, मात्र बाजारपेठ परिसरात कचऱ्याचे अयोग्य व अव्यवस्थित टाकणी वाढल्यामुळे संकलन यंत्रणेला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



नगर परिषदेच्या घंटागाड्या श्रीवर्धन येथील घरगुती व साठवलेला हलका कचरा गोळा करण्यासाठी कानाकोपऱ्यात पोहोचतात. बाजारपेठेतील दुकानांची संख्या मोठी असल्याने या मार्गावर सकाळ व रात्री अशा दोन फेऱ्या ठेवण्यात आल्या आहेत. तथापि, या मार्गावर मोठ्या प्रमाणात गोण्या, खोक्यांत भरलेली खराब धान्य सामग्री किंवा अयोग्य प्रकारचा कचरा घंटा गाडीवर ठेवला जात असल्याचे चित्र कायम दिसते.

अधिक प्रमाणातील अशा कचऱ्यामुळे घंटागाड्या अपेक्षेपेक्षा लवकर भरून जातात. परिणामी घरगुती कचरा गोळा करण्यासाठी नियोजित कर्मचाऱ्यांना कचरा योग्यरीत्या ठेवता येत नाही. अनेक वेळा घंटागाडी वेग घेताच वरच्या बाजूस ठेवलेला हलका कचरा रस्त्यावर उडून पडतो.

शहरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या कचरा डेपोकडे जाणाऱ्या मार्गावर प्लॅस्टिक पिशव्या, रिकाम्या बाटल्या, शिळे अन्नपदार्थ तसेच इतर कचरा पसरलेला आढळतो. अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली असून नगर परिषदेकडून तातडीची उपाययोजना अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६नुसार कचऱ्याची छायांनुसार वर्गवारी व वेगळे संकलन बंधनकारक आहे. अयोग्य प्रकारचा कचरा घरगुती कचऱ्यासाठी असलेल्या वाहनांवर टाकणे हा नियमभंग आहे. अशा प्रकारच्या उल्लंघनावर दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार नगर परिषदेकडे असला तरी प्रत्यक्षात कडाईने अंमलबजावणी न झाल्याचे दिसते.

शहरातील नागरिक, स्थानिक मंडळे आणि सामाजिक संघटनांकडून काही तातडीच्या उपाययोजना सुचवल्या गेल्या आहेत की, बाजारपेठेसाठी स्वतंत्र कचरा संकलन वाहन उपलब्ध करून देणे, नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई सुरू करणे, घंटागाड्यांवर कचऱ्याचे वजन व प्रकार यावर मर्यादा लावणे, डेपो मार्गावर स्वच्छता तपासणी गस्त वाढवणे शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नियमांचे पालन झाल्यास संपूर्ण स्वच्छता व्यवस्थेची कार्यक्षमता अनेक पटींनी वाढू शकते.

# पाणोसे पुलाजवळ ट्रेलर उलटला

**माणगाव : प्रतिनिधी**

पुणे–दिघी महामार्गावर गेले काही दिवस सतत विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातून येणारा जाणाऱ्या ट्रेलर कॉईलचे अपघात होत आहेत. अशाच एक ट्रेलर कॉईलचा अपघात निजामपूर रोडवर पाणोसे पुलाजवळ झाला असून नागरिकांच्या प्रसंगवधानाने चालकाचे प्राण वाचले आहेत.



सविस्तर वृत्त असे की, २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वा. च्या सुमारास निजापमूर कडून माणगाव दिशेने येणाऱ्या ट्रेलर (एमएच ४६ सीयू ३८९१)चा पाणोसे पुलाजवळील वळणावर अपघात झाला. अपघातात ट्रेलर पूर्णतः रस्त्याच्या एक बाजूला पलटी झाला होता. ट्रॅकचालक कॅबिनचा पूर्णपणे चक्काचूर झाल्याने ट्रॅक चालक केबिन खाली अडकून पडला होता. चालक जीवाच्या आकांताने मला वाचवा असे ओरडत होता. नागरिकांनी प्रसंगावधान दाखवत जेसीबी व कटरच्या सहाय्याने ट्रॅक चालकाचा बाहेर काढण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. नागरिक व पोलिसांच्या अथक प्रयत्नाने दोन तासांनी ट्रॅक चालकाला सुखरूप बाहेर काढण्यात आले असून पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे नेण्यात आले आहे.

# एसटी बस स्टॉपची मागणी

**नागोठणे : बातमीदार**

शिवसेना नागोठणे विभाग संघटक दिनेश घाग व युवा सेना नागोठणे अध्यक्ष संदीप वाजे यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पनवेल व्यवस्थापक व व्यवस्थापक प्रमुख एसटी परिवहन कार्यालय रामवाडी ता. पेण व्यवस्थापक प्रमुख यांची भेट घेतली. यात नागोठणे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर या शाळेसमोर आणि रुची हॉटलशेजारी एसटी बसस्टॉपची मागणी केली आहे.

दिनेश घाग व संदीप वाजे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नागोठणे कोकण एज्युकेशन सोसायटीच्या संकुलनात नागोठणे २००० ते २५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तसेच ७० ते ८० शिक्षक कार्यरत असून या परिसरात वासगाव, पिंपळवाडी, लावेची वाडी, नागोठण्यातील केएमजी विभाग आणि परिसरातील लोकांची मोठ्या प्रमाणात रहदारी असते त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, नागरिकांची समस्या पाहून नागोठण्याहून पोलादपूरच्या दिशेने आणि मुंबई कडे जाणाऱ्या एसटी बस थांबवण्यासाठी बस स्टॉप उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनामार्फत दिनेश घाग व संदीप वाजे यांनी केली आहे.

दरम्यान, संबंधित अधिकारीवर्गाने याबाबत सकारात्मक भूमिका दाखवली असल्यामुळे लवकरात लवकर आम्ही केलेली मागणीची पूर्तता होईल, अशी अपेक्षा दिनेश घाग यांनी व्यक्त केली आहे.

# वडगाव ग्रामपंचायतीतर्फे आरोग्य शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वडगाव ग्रामपंचायतीच्यावतीने ठाकूरवाडी, तळवली आणि बोरीवली येथे दोन दिवसांचे आरोग्य शिबिर आयोजित केले होते. बोरीवली शिबिरात डोळ्यांच्या काळजीवर भर देण्यात आला तर इतर शिबिरांमध्ये सामान्य आरोग्य सेवा देण्यात आल्या.

शिबिरांसोबतच वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात मुलांचे आरोग्य जागरूकता सत्र आयोजित करण्यात आले होते तसेच बोरिवली येथे कर्करोग जागरूकता सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

विद्यार्थी आणि समुदायातील सदस्यांनी समवयस्कांचा दबाव, मानसिक आरोग्य, सामना करण्याची कौशल्ये आणि निरोगी खाणे यावरील चर्चेत भाग घेतला.

या उपक्रमाला मर्कने त्यांच्या सीएसआर कार्यक्रमाद्वारे पाठिंबा दिला होता आणि आरोग्यसेवा, शिक्षण आणि समुदाय विकासात काम करणारी सेक्शन आठ संस्था, थर्ड प्लॅनेट फाउंडेशन, दिल्लीद्वारे हा उपक्रम राबविण्यात आला होता.

पाचशे हून अधिक लोकांना आरोग्य जागरूकता समर्थन आणि मोफत तपासणी मिळाली. आत्मविश्वास बळकट करणे, लवकर जागरूकता सुधारणे आणि समुदायासाठी मूलभूत वैद्यकीय सेवा सुलभ करणे हा या प्रयत्नाचा उद्देश होता.

# खैराट येथील जंगलात तरुणाची आत्महत्या

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुका पोलीस ठाणे अंतर्गत चौक पोलीस दूर क्षेत्र हद्दीत खैराट गावाजवळ जंगलामध्ये एका तरुणाची झाडावर गळफास घेऊन आत्महत्या केलेला मृतदेह दिसून आल्याची माहिती चौक प्रभारी विशाल पवार यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी आपल्या सहकाऱ्यांसह धाव घेतली.

मृतदेह गळफास घेऊन झाडावर लटकलेल्या अवस्थेत होता. त्याच्या जवळ असलेल्या कागदपत्रांवरून त्याचे नाव सुनील शेकप्पा धनगुर असे असून वय वर्षे अंदाजे २० आहे. कर्नाटक राज्यातील उपली बीजापूर येथील रहिवाशी आहे, तो सांगली येथे राहत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.त्याच्या मृतदेहाजवळ कागदपत्रात वैद्यकीय अहवाल आहेत,त्यामुळे तो गंभीर आजाराने त्रस्त असावा असा पोलिसांचा अंदाज आहे. त्याच्या नातेवाईक यांच्याशी संपर्क होत नव्हता, उशिराने त्यांना माहिती मिळाल्यावर नातेवाईक चौक येथे पोहचले.

खालापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू गुन्हा रजी.५८/२०२५ नुसार नोंद करण्यात आली आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चौक प्रभारी विशाल पवार पुढील तपास करीत आहेत.

# मानसिक तणावातून तरुणाची आत्महत्या

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव–माळी बेरसे येथील भावेश प्रमोद पाटील (वय २४) या तरुणाने मानसिक तणावातून घरातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना २० नोव्हेंबर २५ रोजी घडली. या घटनेची माहिती त्याचे वडील प्रमोद रघुनाथ पाटील (वय ५५) यांनी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिली.

भावेश हा जिंदाल ड्रग्स प्रायव्हेट लिमिटेड, एमआयडीसी तळोजा या कंपनीत कार्यरत होता. काही दिवसांपूर्वी त्याने कंपनीला राजीनामा दिला होता. त्यामुळे तो सुमारे दीड महिना बेरोजगार होता. बेरोजगारीतून वाढत गेलेले नैराश्य आणि मानसिक तणाव यामुळे तो अधिकच एकाकी बनला.

घरात कोणीही नसताना, भावेशने आपल्या बेडरूममध्ये छताच्या लोखंडी पाईपला ओढणी बांधून गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच त्याला तातडीने रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास तेथे मृत घोषित केले. या प्रकरणाचा पुढील तपास रेवदंडा पोलीस करत आहेत.

# एम.बी. मोरे फाऊंडेशनच्या स्कूलमध्ये अग्निसुरक्षा जनजागृती

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाऊंडेशनच्या इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये शुक्रवारी (२० नोव्हें) अग्निसुरक्षा व अग्नी शमन तंत्रांविषयी मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सायन्सको इंडिया प्रायव्हेट लिमिटेड रोहा, कंपनीतर्फे आलेल्या तज्ञांच्या पथकाने विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना अग्निसुरक्षेबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमात सायन्सको इंडिया प्रायव्हेट लिमिटेड रोहा कंपनीचे साइट हेड राजेश हजारे यांचा विशेष सहभाग होता. त्यांच्यासोबत नितीन डोरिक, दीपक थापा, लुईस साळवी, विजय कासर आणि स्वप्नील साळगावकर यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांना आग विझविण्याच्या पद्धती आणि सुरक्षा नियम समजावून सांगितले.

शाळेतील ५वी ते १०वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सत्रात उत्साहाने सहभाग घेतला आणि अग्निसुरक्षेबाबतच्या अनेक महत्त्वपूर्ण बाबीची संपूर्ण माहिती अवगत केली. शाळेच्या मुख्याध्यापिका तेजल सावंत यांनी सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी असे उपयुक्त कार्यक्रम भविष्यातही राबविण्याची इच्छा व्यक्त केली.



# वाशीहवेली ग्रामपंचायतीला कोकण विभागीय संत गाडगे महाराज समितीची भेट

**तळा : प्रतिनिधी**

कोकण विभागीय संत गाडगे महाराज अभियान समितीने तळा तालुक्यातील वाशीहवेली ग्रामपंचायतीला भेट दिली.

समिती मधील समिती प्रमुख व इतर सहाय्यक आयुक्त कोकण भवन प्रदीप घोरपडे, लघुलेखक कोकण विभाग गणेश गांधळे,जिल्हा कार्यक्रम अधिकारी जयवंत गायकवाड, गटविकास अधिकारी तळा महादेव शिंदे,आदी अधिकारी व समितीचे सदस्य उपस्थित होते.



या वेळी समितीने गावात राबविलेल्या उपक्रमांची, विविध योजनांची तसेच गावातील स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, हरित उपक्रम, डिजिटल सुविधा, लोकसहभाग पाहून समाधान व्यक्त केले. गावाच्या सर्वांगीण कामगिरीचे कौतुक करून आदर्श मॉडेल म्हणून हे गाव इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरेल असे म्हटले आहे.

वाशीहवेली ग्रामपंचायतीला उंच शिखरावर नेण्यासाठी माजी सरपंच जगन्नाथ तांडेल यांनी विविध योजना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नेहमीच प्रयत्न करत राहिले आहेत. त्यांनी विविध उपक्रम यशस्वी राबवून विविध पुरस्कार ग्रामपंचायतीला सर्वांच्या सहकार्याने प्राप्त झाले आहेत. यासोबतच सामाजिक बांधिलकी म्हणून माजी सरपंच जगन्नाथ तांडेल, कोळी समाजाध्यक्ष ज्ञानदेव तांडेल, कुणबी समाज अध्यक्ष रमेश ताम्हणकर, बौध्द समाजाध्यक्ष किशोर मोरे, कोळी समाज महिला मंडळ अध्यक्षा पदमू मेंदाडकर,कुणबी समाज महिला अध्यक्षा राहिला ताम्हणकर, बौध्द समाज महिला अध्यक्षा सुनंदा मोरे, आदिंसह गावच्या विकासात व विविध उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात महत्वाचा सहभाग आहे.

गेल्या पाच वर्षांत वाशीहवेली ग्रामपंचायतीने स्वच्छता, पाणी व्यवस्थापन,पर्यावरण संवर्धन, डिजीटल प्रशासन, महिला सक्षमीकरण व सर्वांगीण ग्रामिण विकासाच्या क्षेत्रात राज्य व राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सतत या ग्रामपंचायतीमध्ये विविध उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असल्याने सर्व ठिकाणी या ग्रामपंचायतीचे नाव आदराने घेतले जाते.


## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की. आमचे अशिल **सौ. वैशाली मिलिंद काकडे, रा. धनकवडी, पुणे** यांचा खालील वर्णनाच्या मिळकतींमध्ये **कै. सुधाकर विश्वासराव चव्हाण** यांचे कायदेशिर वारसदार म्हणून अविभक्त हिस्सा आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गावाचे नाव | मिळकत क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|
| पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | नगर भुमापन नं. १५१९/१ | १०६.२० चौ.मी. |
| पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | नगर भुमापन नं. १५१९/२ | १२१.२० चौ.मी. |
| पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | नगर भुमापन नं. १५२० | २६०.९० चौ.मी. |
| मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड | भुमापन नं. १७२/३/२ | ०–१०–४० हे.आर.चौ.मी. |
| मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड | भुमापन नं. १७२/३/३ | ०–०२–८० हे.आर.चौ.मी. |

तरी या सावधान नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय **श्री. गिरीश सुधाकर चव्हाण, रत्नप्रभा सुधाकर चव्हाण, दिपाली जयदीप देशमुख, गितांजली प्रदीप झांबरे अथवा इतर** कोणाशीही कोणताही व्यवहार करु नये व असा व्यवहार करण्यात आल्यास तो बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच सदर व्यवहारामुळे आमच्या अशिलांची फसवणूक होवून त्याबाबत आमचे अशिल सदर खरेदीदाराविरुध्द योग्य ती फौजदारी कारवाई करतील याची देखील नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २२/११/२०२५**

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र.: २७४५६३०६



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत ही सदर जमिनीचे मालक श्री. **प्रदिप दिनकर ओक** यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड.**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|
| १/य/१५ (प्लॉट नं. २४ सब प्लॉट नं. १ ते ८) | ४०.५०.०० | ४०५.०० |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदी/विक्री करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :– २३/११/२०२५**

**सही/–**
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**
**कार्यालयीन पत्ता :– शॉप नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाटयगृह जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**
**मो.बा. ८०९७३९९३३१**


# सर्व्हेक्षण समितीची कर्जत एसटी आगाराला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत सर्व्हेक्षण समितीने सकाळच्या सुमारास अचानक कर्जत एसटी आगाराला भेट दिली व सर्व परिसराची पाहणी केली तसेच कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी केली. समितीने कर्जत आगाराच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून अधिक चांगले आगार होण्यासाठी महत्वाच्या सूचना केल्या.



सकाळी दहाच्या सुमारास सिंधुदुर्ग जिल्ह्याचे विभाग नियंत्रक दीपक घोडे यांच्या अध्यक्षतेखालील सर्व्हेक्षण समिती कर्जत एस टी आगारामध्ये आली. विभागीय अभयंता अक्षय केकरे, समिती सदस्य विजय मांडे, प्रवासी प्रतिनिधी कौस्तुभ मोकल यांचा समितीमध्ये समावेश होता. आगार व्यवस्थापक देवानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सहाय्यक वाहतुक नियंत्रक महादेव पालवे, वाहतूक नियंत्रक दिपक देशमुख, वाहतूक नियंत्रक विलास बागुल, वाहतूक नियंत्रक संजय कोंडार, मुख्य कारागीर संभाजी दौंड यांच्या समवेत संपूर्ण आगार परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छता गृहाच्या स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय दिला तसेच प्रवासी निवारा, सी एन जी पंपाची व्यवस्था, कार्यालयातील कामामध्ये वेगळ्या प्रकारच्या मांडणी बद्दल समाधान व्यक्त केले. मात्र स्वच्छतेबद्दल सूचना दिल्या.

आगार व्यवस्थापकांचे निवास स्थान तसेच इमारतींची दुरुस्ती याबाबत सूचना केल्या. कमी मनुष्यबळ असूनही आगार चांगल्या प्रकारे चालू आहे. याबाबत समिती सदस्यांनी प्रशंसोदगार काढले. समिती अध्यक्ष दीपक घोडे यांनी प्रवासी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. परिसरात एखादे उद्यान विकसित करावे. प्रवासी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. अशा सूचना केल्या. मोरे यांनी, आगारासाठी नवीन एस टी गाड्या आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न आहे, असे सूचित केले.

सदस्य मांडे यांनी, हे आगार १९८०च्या दरम्यान सुरु झाले. आगारासाठी भरपूर जागा आहे, मात्र बहुतांश इमारती नादुरुस्त आहेत. नूतनीकरणासाठी झाल्यास आगाराचे रूप बदलले जाईल.असे सांगितले.

# वावडुंगी ग्रामपंचायत भागात सीसीटीव्ही कॅमेरे

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड ग्रामपंचायत हद्दीतील सायगाव,महालोर रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या च्या सुरक्षेचा दुष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून सरपंच ऋतुजा वरणकर व शिवसेना युवा उप जिल्हाप्रमुख दिपेश वरणकर यांनी स्वः खर्चाने सिसिटीव्ही कॅमेरे बसविले.

या उपक्रमामुळे या भागातील हालचालीवर अधिक लक्ष ठेवता येणार आसुन यामुळे पोलिसांना गुन्हेगारी आणि अपघात रोखण्यात मदत होणार आहे. ऋतुजा वरणकर व दिपेश वरणकर हे दांपत्य नेहमीच सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असतात. शालेय विद्यार्थी व ग्रामस्थ यांच्या सुरक्षितेसाठी सदरचे कॅमेरे खूप आवश्यक असणार आहेत.

सरपंच ऋतुजा वरणकर यांनी सांगितले की, आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही याठिकाणी काम करत आहोत.महिलांच्या सुरक्षेचे साठी आम्ही या ठिकाणी कॅमेरे बसवत आहोत.

सीसीटीव्ही कॅमेरे म्हणजे सार्वजनिक ठिकाणी नजर ठेवणारे डोळे ते गुन्हेगारांना पकडण्यास मदत करतात.हे कॅमेरा चांगल्या दर्जाचे आहेत. सध्या या रस्त्यावरून गाड्याच धावणाचं प्रमाण वाढत आहे. तसेच मद्यपी चा वावर जास्त असल्याने या ठिकाणी कॅमेरे बसविणे आवश्यक होत. या कॅमेरामुळे त्यांना धाक बसेल आणि गुन्हेगारी आणि गैरप्रकारांना आळा बसेल. कॅमेरा बसविल्याने शालेय विद्यार्थी खुष झालेत. यातच आमचा खरा आनंद मिळाला.

कॅमेरे बसवितेवेळी उपसरपंच सुवर्णा भुवड, सदस्य शाहिंदा, नितेश वाघमारे, गौतमी मोरे, नजीर कडू, जबाब जमादार, पांडुरंग जाधव मंगेश मोरे, निलम भुवड, सर्फराज कडू, राजु इद्रुस आदी उपस्थित होते.


## नावात बदल

माझे जुने नाव **मुसलमान युनुस एसके अनवर,** राहणार नेहती, पोस्ट खिरवाड, ता. रावेर, जि. जळगाव ४२५५०८, राज्य महाराष्ट्र, हे माझे जुने नाव असून, मी **महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. M25273153 दि.३०/१०/२०२५** रोजी **शेख युनुस एसके अनवर** असे बदलले असून, मी **शेख युनुस एसके अनवर** या नवीन नावाने ओळखला जाईन.

**दि. २२/११/२०२५**

**सही/–**
**शेख युनुस एसके अनवर**
नवीन नाव

## निवडक

### मुलीसह महिला बेपत्ता

**पनवेल :** २१ वर्षीय महिला आपल्या १४ महिन्यांच्या मुलीसह बेपत्ता झाल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. प्रियंकाकुमारी फुटरमल माली ह्या खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हरवले आहेत. त्यांची उंची चार फूट पाच इंच, रंग सावळा, अंगाने मध्यम आहे. तिला हिंदी आणि भोजपुरी भाषा बोलता येते. त्यांनी सोबत १४ महिन्यांच्या मुलीला नेले आहे. यांच्याबाबत अधिक माहिती असल्यास महिला पोलीस नाईक स्वप्नाली घाडी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कदम, मगर यांचा सत्कार

**पनवेल :** तालुक्यातील पत्रकारांनी ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व आप्पासाहेब मगर यांची शासनाच्या वंदे मातरम कमिटीवर नियुक्ती केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या वेळी पत्रकार मुकेश शिंदे, अण्णासाहेब आहेर, रायगड सम्राट संपादक शंकर वायदंडे, पत्रकार लालचंद यादव, शंकर वायदंडे, सुनील वारगडा, प्रकाश मत्रे, शेखर सपाने, संदेश सोनमळे, अण्णासाहेब आहेर, संतोष आमले, मुकुंद कांबळे, कैलास नेमाडे आदी उपस्थित होते.



### पूरग्रस्तांसाठी ५१ हजारांची मदत

**पनवेल :** शिवसैनिक राहुल गोगटे यांची मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी ५१ हजार रुपयांची मदत केली आहे. या मदतीचा धनादेश महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे राहुल गोगटे यांनी सुपूर्द केला. या वेळी भाजपचे ज्येष्ठनेते व माजी नगरसेवक श्रीनंद पटवर्धन उपस्थित होते.



### करंजाडेतून एक जण बेपत्ता

**पनवेल :** बिल्डिंग खालून येतो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याची घटना करंजाडे वसाहतीमध्ये घडली असून याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. महादेव शिवाजी सोनावणे (वय ४० वर्षे रा. से-०४ करंजाडे) असे या इसमाचे नाव असून त्याचा रंगाने सावळा, उंची ५ फुट ३ इंच, अंगाने मजबुत, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे मध्यम वाढलेले, डोळे -काळे, नाक - सरळ, निशाणी उजव्या हाताचे मधले बोट तुटलेले, अंगात खाकी शर्ट, निळी फुल जिन्स पॅन्ट, पायात काळी चप्पल, मराठी, हिंदी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोहवा युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### विद्यार्थ्यांना कायदेसंबंधित मार्गदर्शन

**पनवेल :** शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ, बालक व महिला अत्याचार कायदे संबंधित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. वपोनी नितीन ठाकरे, सपोनि प्रवीण फडतरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील मायनॉरिटी उर्दू व इंग्लिश स्कुल, पनवेल या ठिकाणी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, अंमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम, महिला व बालक लैंगिक अत्याचार संबंधित कायदे, अति मोबाईल वापराचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी मायनॉरिटी उर्दू व इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# शिरवणे गावातील पदपथांवर अतिक्रमण

## शोरूम-गॅरेजच्या वाहनांमुळे नागरिकांना रस्त्यावरून चालण्याची वेळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळच्या शिरवणे गावातील मुख्य रस्ते व पदपथांवर वाहनांनी अतिक्रमण केले आहे. परिसरातील वाहनांच्या शोरूम आणि गॅरेजकडून रस्त्यावर व पदपथावर मोठ्या प्रमाणावर वाहने उभी केल्यामुळे वाहतूक कोंडी, असुविधा आणि अपघाताचा धोका वाढला आहे. ही समस्या दिवसेंदिवस तीव्र होत असून पादचारी, शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

गावाच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत येताच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना चारचाकी-दुचाकी वाहने आणि टेम्पोचे शोरूम्स तसेच गॅरेज आहेत. या शोरूम्समध्ये विक्रीसाठी ठेवलेली वाहने, गॅरेजमध्ये दुरुस्तीसाठी आलेली वाहने किंवा चाचणीसाठी काढण्यात आलेली वाहने थेट रस्त्यावर आणि पदपथांवर उभी केली जातात. आस्थापनासाठी जागा अपुरी असल्याने सार्वजनिक रस्ताच 'वाहनतळ' म्हणून वापरला जात असल्याने पादचाऱ्यांकडून याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. वाढते अतिक्रमण, शोरूमचा अनियंत्रित विस्तार आणि रस्त्यावरील असुरक्षितता यावर तातडीने लक्ष देऊन रस्ते पादचाऱ्यांसाठी मोकळे करावेत, अशी मागणी नागरिकांकडून प्रशासनाला करण्यात येत आहे.जवळच असलेल्या औद्योगिक क्षेत्राकडे जाणारे कामगार, कार्यालयीन कर्मचारी, शाळकरी मुले आणि महिला यांच्यासाठी हा मार्ग अधिकच धोकादायक ठरत आहे.



शिरवणे हे ठाणे-बेलापूर पट्ट्यातील जुने बाजारपेठेचे गाव आहे. रविवारी होणाऱ्या आठवडी बाजाराच्या दिवशी येथे विशेष गर्दी असते. व्यापार, खरेदीदारांची वर्दळ आणि शोरूमच्या वाहनांमुळे रस्ता पूर्णपणे व्यापून जातो. अशा वेळी वाहतूक संथ झाल्याने आपत्कालीन वाहनांना मार्ग मिळणेही अवघड होते.

पदपथ व रस्त्यांवरील अतिक्रमण हटवावे, शोरूम-गॅरेजची वाहने निर्धारित मर्यादेत ठेवण्यास बांधील करावे, तसेच नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशा मागण्या नागरिकांनी महापालिकेला वारंवार केल्या आहेत.

# एआय क्युरिऑसिटी कार्निवलमध्ये 'सीकेटी'चा ध्रुवल म्हात्रे प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर यांच्या वतीने संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त इंटर स्कूल एआय क्युरिऑसिटी कार्निवलचे आयोजन शुक्रवारी (दि.२१) करण्यात आले होते.

या कार्निवल मध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तसेच परिसरातील अनेक शाळांनी सहभाग घेतला होता. सीकेटीच्या ध्रुवल दीपक म्हात्रे (बारावी सायन्स) या विद्यार्थ्याने ड्रोन फार्मिंग या विषयावर स्वतः तयार केलेले उपकरण सादर करून प्रात्यक्षिक करून दाखवले. ध्रुवलने स्वतः तयार केलेल्या उपकरणास प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्रुवलचा ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला. तसेच वैष्णवी नितीन शिंदे (बारावी सायन्स) या विद्यार्थिनीने सोलर हायब्रीड इन्व्हर्टर या विषयावर तयार केलेल्या प्रकल्पास सहभाग प्रमाणपत्र देऊन तिचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कुरिओसिटी कार्निवलमधून हे सिद्ध झाले की विद्यार्थ्यांना ए आय याविषयीची माहिती प्रदर्शित करण्याची संधी तर मिळतेच त्याचबरोबर एकत्र काम करण्याची आणि आपल्या अभिनव कल्पनांना चालना देण्याचीही संधी मिळत असते.

ध्रुवलने मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, विज्ञान विभाग सहशिक्षिका आरती खूपसे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उलवेमध्ये इंटरनेट केबल सर्व्हिसचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रत्येकाशी प्रेमाणे वागून चांगली सेवा कशी देता येईल यावर लक्ष केंद्रीत करा, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री एकविरा कृपा इंटरनेट केबल सर्व्हिसेचच्या उद्घाटनावेळी उलवे येथे केले.

उलवे परिसरात वाढते नागरीकरण लक्षात घेता नव नवीन उद्योग सुरू होत आहेत. त्यानुसार उलवे सेक्टर ६ प्लॉट नं २ अनंता टॉवर येथे श्री एकविरा कृपा इंटरनेट केबल सर्व्हिस सुरु करण्यात आली आहे. सागर शशिकांत ठाकूर यांनी सुरु केलेल्या या नवीन व्यवसायाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी त्यांनी शशिकांत ठाकूर यांचे अभिनंदन करून त्यांना व्यवसायाच्या पुढील यशस्वी वाटचाली करता शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमावेळी माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, सागर ठाकूर, अमर म्हात्रे, निलेश खारकर, सचिन घरत, निकिता खारकर, अमित नाईक, अनुप भगत, धीरज ओवलेकर, वितेश म्हात्रे, अस्मिता भगत, मानसी ठाकूर, पारुबाई नाईक, अंकुश ठाकूर, राजा देवेंद्रन, शशिकांत ठाकूर, सनी देवेंद्रन, महादेश देवेंद्रन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



# उरण नगराध्यक्षपदासाठी चार आणि नगरसेवकासाठी ४८ उमेदवार रिंगणात

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर**

उरण नगर परिषद निवडणुकीसंदर्भात २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी संपूर्ण चित्र स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्षपदासाठी एकूण ४ उमेदवार, तर नगरसेवक पदाच्या २१ जागांसाठी तब्बल ४८ उमेदवार अंतिम रिंगणात असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.उद्धव कदम यांनी जाहीर केले.

पाच जणांनी अर्ज मागे घेतल्यानंतर आता उरणमध्ये निवडणुक लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून प्रचारात अधिकच रंगत येणार आहे.

नगराध्यक्षपदासाठी भाजप महायुतीकडून कोळी शोभा-शाह, महाविकास आघाडीच्या वतीने भावना कुंदन घाणेकर या मुख्य उमेदवारांखेरिज शिंदे गटाकडून रूपाली तुषार ठाकूर, तर अपक्ष म्हणून शेख नसरीन इसरार निवडणूक रिंगणात आहेत.

नगरसेवकपदांच्या २१ जागांसाठीच्या सर्व प्रभागांची उमेदवार यादीही २१ नोव्हेंबर २०२५ रोजी निश्चित झाली आहे. प्रभाग १मध्ये रजनी कोळी, प्रीती कोळी, जविंद्र कोळी, राकेश कोळी; प्रभाग २मध्ये रिबेका मढवी, रसिका मेश्राम, नंदकुमार लांबे, विक्रम म्हात्रे व अंजली खंडागळे; प्रभाग ३मध्ये नम्रता ठाकूर, वंदना पवार, सुरेश शेलार, अमित म्हात्रे, तुषार ठाकूर व शेख खालीक; प्रभाग ४मध्ये संदीप पानसरे, अतुल ठाकूर, हंसराज चव्हाण, रोशनी थळी, प्रमिला पवार व रुपाली ठाकूर; प्रभाग ५मध्ये धनश्री शिंदे, नाहिदा ठाकूर, जसिम इस्माईल व अफशान मुकरी; प्रभाग ६मध्ये स्नेहल पाटील, मंगेश कासारे, रीना पाटील व तनिषा पाटील; प्रभाग ७मध्ये शाईस्ता कादरी, प्रार्थना म्हात्रे, रवी भोईर, शादाब शेख व अशमील मुकरी; प्रभाग ८मध्ये पूर्वा वैवडे, विना तलरेजा, रोहित पाटील व विजय जाधव; प्रभाग ९मध्ये गणेश पाटील, हेमंत पाटील, सायली पाटेकर व यशस्वी म्हात्रे; तर प्रभाग १०मध्ये राजेश ठाकूर, ओमकार घरत, सायली म्हात्रे, कमल पाटील, दमयंती म्हात्रे व लता पाटील अशा ४८ उमेदवारांची निवडणूक लढत निश्चित झाली आहे.



२१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्षपदासाठी १ आणि नगरसेवकपदासाठी ४ उमेदवारांनी माघार घेतल्याने प्रत्येक प्रभागातील स्पर्धा सुटसुटीत झाली आहे. अनेक प्रभागांत भाजप व महाविकास आघाडी यांच्यात थेट आमनेसामने लढत असून शिंदे गट आणि अपक्ष उमेदवारही आपले राजकीय नशीब आजमाावित आहेत.

उरण शहरात स्थानिक कार्यतत्पर व लोकप्रिय आमदार महेश बालदी यांनी अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत, तर आगामी काळात अन्य समस्या मार्गी लावण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. शहरात महिलांसाठी स्वच्छतागृह, पाणीपुरवठा, पायाभूत सुविधा, वाहतूक, हॉस्पिटल, अपघात, कचरा, वीजपुरवठा, रस्ते, करप्रणाली, स्वच्छता, आरोग्यसेवा यांसारख्या विषयांवर आमदार महेश बालदी आणि सहकारी काम करणार आहेत.

अर्ज माघारीनंतर निवडणुकीतील लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यानंतर आता येत्या काही दिवसांत गारेगार थंडीमध्ये प्रचार तापमान वर चढणार आहे.

# ओवळे ते शिर्डी पदयात्रेचे खिडूकपाडा येथे जल्लोषात आगमन

**पनवेल : वार्ताहर**

श्री साई सेवा मंडळ ओवळे तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ व्या वर्षी साईभक्तांची ओवळे - पनवेल ते शिर्डी पदयात्रा उत्साहात सुरु झाली. आज या पालखी दिंडीचे आगमन पनवेल तालुक्यातील खिडूकपाडा गावात झाल्यानंतर संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. खिडूकपाडा वासिय साईभक्त, मान्यवरांच्या उपस्थितीत या पदयात्रेतील साई भक्तांसाठी अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी साईभक्तांकडून ओम साई राम, साईनाथ महाराज की जयच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.



कार्यक्रमाची सुरुवात रथ पूजनाने करण्यात आली. या वेळी खिडूकपाडा साई मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास उर्फ आण्णा भोईर, सुरेश भोईर यांनी रथ पूजन तसेच पालखी पूजन केले. या पालखी सोहळ्याचे स्वागत ठिकठिकाणी झाले. खिडूकपाडा येथील साई मंदिराची स्थापना सन २०१० साली झाली त्यावेळेपासून ओवळे येथून निघणाऱ्या साईंच्या पदयात्रेचे याठिकाणी आगमन होत असून याठिकाणी ग्रामस्थांच्यावतीने साईंची सेवा करण्याचे भाग्य आम्हाला दिल्याबद्दल आम्ही खिडूकपाडा ग्रामस्थ श्री साई सेवा मंडळाचे आभारी असल्याचे मत यावेळी खिडूकपाडा साई मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास उर्फ आण्णा भोईर यांनी व्यक्त केले.

या वेळी पालखी निघताना अनेक साईभक्त बंधू-भगिनींनी पदयात्रेत सामील होऊन प्रेमळ निरोप दिला. यावेळी ओम साई राम च्या घोषणांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. ही पदयात्रा साईभक्तांच्या श्रद्धेचा प्रतीक असून, शिर्डीपर्यंत भाविक मोठ्या भक्तिभावाने ही यात्रा पूर्ण करणार आहेत.

# ऐरोलीत भाजयुमोची संघटनात्मक बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

संत सावता माळी भवन, सेक्टर ५ येथे भारतीय जनता युवा मोर्चा ऐरोली मंडळाची संघटनात्मक बैठक वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली आणि नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या सूचनेनुसार उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

बैठकीत युवा संघटन अधिक सक्षम करण्यासाठी विविध संघटनात्मक निर्णय घेण्यात आले. येणाऱ्या पालिका निवडणुकीत महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकविण्यासाठी युवा मोर्चाकडून प्रभावी भूमिका बजावली जाईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. या वेळी भाजपा नवी मुंबई महामंत्री माजी नगरसेवक अनंत सुतार, ज्येष्ठ नगरसेवक अशोक पाटील, मंडळ अध्यक्ष राजेश मढवी,



समाजसेवक सुदर्शन जिरगे, समाजसेवक शिवाजी खोपडे, युवा मोर्चा ऐरोली मंडळ अध्यक्ष अमर सुतार, चारुदत्त ठाणांबीर तसेच भाजयुमोचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

युवा मोर्चाच्या माध्यमातून ऐरोलीच्या विकासाला गती मिळणार असून युवा शक्ती हीच बदलाची शक्ती असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# फुंडे विद्यालयात वाहतूक सुरक्षा जनजागृती



**उरण : रामप्रहर वृत्त**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे विद्यार्थ्यांसाठी वाहतूक सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. न्हावा शेवा पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक वैशाली गलांडे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या वेळी गलांडे यांनी वैध परवाना नसताना वाहन चालवू नये, वाहन चालवताना कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये, दुचाकी वाहन चालवताना चालक व मागील व्यक्तीने हेल्मेटचा अनिवार्य वापर करावा, तसेच चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्ट लावणे आवश्यक आहे, असे सांगत सिग्नलचे नियम पाळण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

या वेळी न्हावा शेवा पोलिस स्टेशनचे पोलीस नाईक श्री. भांगरे व पोलिस शिपाई श्री. ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळुंखे, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर, एस. एस.पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख बी.पी. पाटोळे, दि रायगड सेवक को-ऑप बँकेचे संचालक किशोर पाटील, एच. एन. पाटील, एस. डी.म्हात्रे, के.एस. पवार, के.एच. सरोदे, पी.डी कदम, पी.एस ठाकूर. यांची उपस्थिती लाभली.तसेच माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.



# वीर वाजेकर महाविद्यालयात सतर्कता जागृती मोहीम

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व जे.एन.पी.ए. यांच्या संयुक्त विद्यमाने सतर्कता जागरूकता निमित्त हिमांशू वैष्णोई यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक जगताप यांनी केले. १७ ऑगस्ट ते २ नोव्हेंबरदरम्यान सतर्कता जागरूकता आठवडा साजरा केला जातो, त्यानिमित्ताने नीतिमत्ता आणि शासन याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाल्यास भविष्यात भ्रष्टाचार रोखण्यासाठी फार उपयुक्त होऊ शकते. मा.हिमांशू विषनोई यांनी आपल्या व्याख्यानातून नोकरी,व्यवसाय एकूणच सेवेच्या ठिकाणी भ्रष्टाचार होऊ नये म्हणून नीतिमूल्ये याविषयावर सखोल माहिती दिली.

प्रभारी प्राचार्य, डॉ.आमोद ठक्कर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातूनच्या सहकार्यामुळेच या महाविद्यालयाचा विकासात मोलाचे योगदान असल्याचे नमूद केले. जे.एन.पी.ए ने आपल्या इतर विभागातील तज्ञ पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आमच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुजाता पाटील यांनी केले, प्रा.गजानन चव्हाण,उपप्राचार्य यांनी व्यक्त केले.

स्वप्नील पोकलवार, सुनील मॅथ्यू, प्रा.राम गोसावी, चेअरमन राष्ट्रीय सेवा योजना, प्रा.बळीराम पवार कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना प्रा.विशाल देशमुख, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# नगर परिषद निवडणूक लढतींचे चित्र स्पष्ट

## कर्जतमध्ये नगराध्यक्षपदासाठी दुरंगी लढत

**कर्जत : प्रतिनिधी**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर कर्जत नगर परिषद निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. १५ उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर नगराध्यक्षपदासाठी दुरंगी लढत होणार आहे, तर नगरसेवकपदाच्या १७ ठिकाणी दुरंगी आणि चार अपक्ष उमेदवारांमुळे ठिकाणी तिरंगी लढती होणार आहेत.

नगराध्यक्षपदासाठी एकूण पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी तीन उमेदवारांनी निवणुकीतून माघार घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस-उबाठा परिवर्तन आघाडीच्या पुष्पा हरिश्चंद्र दगडे आणि भाजप-शिवसेना-आरपीआय महायुतीच्या डॉ. स्वाती अक्षय लाड यांच्यामध्ये सरळ लढत होणार आहे.

प्रभाग एक अ मध्ये जयदीप कृष्णा पाटील अपक्ष उमेदवारी लढवत असल्याने तेथे तिरंगी लढत, तर प्रभाग एक ब मध्ये सरळ लढत होणार आहे. प्रभाग दोन अ आणि ब, प्रभाग तीन अ आणि ब, प्रभाग चार अ आणि ब, प्रभाग पाच अ मध्ये एकास एक उमेदवार असल्याने सरळ लढत, तर प्रभाग पाच ब मध्ये उमेश अर्जुन शेलार हे अपक्ष उमेदवार असल्याने तिरंगी लढत होणार आहे.

प्रभाग सहा अ आणि ब, प्रभाग सात अ आणि ब, प्रभाग आठ अ आणि ब मध्ये सरळ लढत आहे. प्रभाग नऊ अ मध्ये राजेश पिराजी साळुंखे अपक्ष निवडणूक लढवत असल्यामुळे या प्रभागात तिरंगी लढत होणार आहे. प्रभाग नऊ ब मध्ये दुरंगी लढत आहे. प्रभाग दहा अ आणि क मध्ये दुरंगी लढत होणार आहे, तर प्रभाग दहा ब मध्ये नितेश राजेंद्र बाचल अपक्ष उमेदवार असल्याने तिरंगी लढत होईल.

या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने नगराध्यक्षासह काही प्रभागात उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते, मात्र त्यांनी सर्वांनी अर्ज मागे घेतल्याने ते निवडणुकीतून बाहेर पडले. या निवडणुकीत पाच अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत. त्यापैकी प्रभाग सहा ब मधील उमेदवार प्रशांत वसंत पाटील यांनी नामनिर्देशनपत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून दाखल केले, मात्र ए बी फॉर्म उबाठा शिवसेनेचा दिल्यामुळे त्यांचा अर्ज बाद झाला. त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणूनसुद्धा अर्ज दाखल केल्याने ते निवडणूक रिंगणात राहिले आहेत. अन्य चार अपक्ष उमेदवार आपले नशीब अजमावित असले तरी त्यांना मिळणाऱ्या मतांमुळे आटीतटीच्या लढतीत एखाद्याला फटका बसण्याची शक्यता आहे.

## अलिबागमध्ये १९ नगरसेवकपदांसाठी ४१ उमेदवार रिंगणात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषद नगराध्यक्षपदासाठी भरलेले अर्ज तीन उमेदवारांनी मागे घेतले. आता नगराध्यक्षपदासाठी शेकापच्या अक्षया नाईक, महायुतीच्या तनुजा पेरेकर यांच्यात सरळ लढत होणार आहे. १९ नगरसेवकपदासाठी ४१ उमेदवार रिंगणात आहेत. १७ जागांसाठी सरळ, तर २ जागांसाठी तिरंगी लढत होईल.

अलिबागचे नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे. नगराध्यक्षपदासाठी ६ अर्ज आले होते. त्यापैकी एक अर्ज छाननीत अवैध ठरला होता. वैध ठरलेल्या ५ जणांपैकी अपक्ष ॲड.कविता प्रवीण ठाकूर, शेकापच्या ॲड.मानसी म्हात्रे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या भारती रनवरे यांनी आपला नगराध्यक्षपदासाठी भरलेले उमेदवारी अर्ज मागे घेतले. आता नगराध्यक्षपदासाठी शेकापच्या अक्षया नाईक आणि महायुतीच्या तनुजा पेरेकर यांच्यात सरळ लढत होणार आहे.

अलिबागमध्ये १० प्रभागामधून २० नगरसेवक निवडायचे होते. प्रभाग क्रमांक २ ब मधून शेकापचे उमेदवार माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १९ नगरसेवकपदासाठी निवडणूक होईल. नगरसेवकपदासाठी ७५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील ११ अर्ज छाननीत अवैध ठरले. ६४ वैध ठरले होते. २२ जणांनी अर्ज मागे घेतले आता १९ नगरसेवकपदासाठी ४१ उमेदवार रिंगणात उरले आहेत. १९पैकी १७ ठिकाणी सरळ लढती होतील. प्रभाग क्रमांक ४ मधून २ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. या दोन जागांसाठी महायुती, शेकाप-काँग्रेस तसेच शिवसेना ठाकरे गट आघाडी अशी तिरंगी लढत होईल.

## मुरूडमध्ये चार उमेदवारांची माघार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीकरिता १ नगराध्यक्ष व १२ नगरसेवकांचे अर्ज छाननीत अपात्र झाले होते. ४ नगराध्यक्ष, तर ६२ नगरसेवक उमेदवारी अर्ज वैद्य ठरविण्यात आले होते. शेवटच्या दिवशी नगरसेवकपदासाठी प्रभाग क्रमांक ९ ब मधून अपक्ष उमेदवार अनिता जगदीश सरपाटील, सुवर्णा प्रकाश सरपाटील, प्रभाग क्रमांक ६ ब मधून शरयु विनोद भगत व थेट नगराध्यक्षपदासाठी शरयु विनोद भगत यांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक मागे घेतला गेला. यामुळे २० सदस्यांसाठी ५८ उमेदवार, तर थेट नगराध्यक्षपदाकरिता तिरंगी लढत होणार आहे.

## कर्जतमध्ये १२ उमेदवारांचे अर्ज मागे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी नगराध्यक्षपदासह एकूण १०० नामनिर्देशनपत्रे दाखल झाली होती. छाननीमध्ये त्यातील ३८ अवैध, तर ६२ वैध ठरली. त्यानंतर १५ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने एकूण ४७ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये काही अपक्ष उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

कर्जतमध्ये भाजप, शिवसेना, रिपाई महायुती विरुद्ध राष्ट्रवादी, उबाठा यांची आघाडी निवडणूक लढवत आहे.

## श्रीवर्धन : २० जागांसाठी ६० उमेदवारांमध्ये लढत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषद निवडणूक अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी ५ ब प्रभागातील अपक्ष उमेदवार रितेश शांताराम मयेकर आणि ८ ब प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सायमा असलम काळोखे यांनी माघार घेतली. यामुळे २० सदस्य जागांसाठी ६० उमेदवारांची शर्यत अधिक चुरशीची बनली आहे.

नगराध्यक्षपदासाठी आरंभी ५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते, मात्र छाननी व माघारीनंतर ४ उमेदवारांचा थेट सामना रंगणार आहे. प्रतिष्ठेच्या या पदासाठी मतदारांमध्ये उत्सुकता वाढत असून राजकीय समीकरणेही वेगाने बदलत आहेत.

नगराध्यक्षपदासाठी जितेंद्र प्रभाकर सातनाक (राष्ट्रवादी काँग्रेस-भाजप युती), अक्षता प्रितम श्रीवर्धनकर (शिवसेना), अतुल अरविंद चौगुले (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे-काँग्रेस आघाडी), रवींद्र पोशा चौलकर (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार) यांच्यात लढत आहे.

या निवडणुकीला आणखी रंगत येण्यामागे एका बाजूला आमदार आणि खासदारांच्या माध्यमातून कार्यरत असलेले केंद्रीय राज्यमंत्री सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांचे राजकीय बळ, तर दुसऱ्या बाजूस मंत्री भरत गोगावले यांचे संघटन असल्याने वातावरण तापले आहे.

## माथेरानमध्ये १० प्रभागांत ४८ उमेदवार

**माथेरान : प्रतिनिधी**

येथील नगर परिषद निवडणुकीत २४ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता एकूण १० प्रभागांमध्ये मिळून ४८ उमेदवार रिंगणात आहेत.

माथेरानमधील एकूण १० प्रभागात महिला व पुरुष उमेदवार मिळून २० उमेदवार पक्षाच्या चिन्हावर लढणार असून थेट नगराध्यक्षपदासाठी दोन उमेदवार समोरासमोर लढणार आहेत.त्याचबरोबर सहा अपक्ष उमेदवार रिंगणात असल्याने एकूण ४८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

## पेणमध्ये ४८ उमेदवार निवडणूक रिंगणात

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या निवडणुकीत अनेक उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आता नगराध्यक्षपदासाठी ३ व नगरसेवकपदासाठी ४५ उमेदवार रिंगणात उभे आहेत.

या अगोदरच महायुतीचे चार सदस्य बिनविरोध निवडून आले होते व शेवटच्या दिवशी काही ठिकाणी उमेवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने आणखी दोन उमेवार निवडून आले आहेत.

यामुळे निवडणुकीआधीच महायुतीच्या सहा जागा बिनविरोध निवडून आल्याने महायुतीचे पारडे जड झाले आहे.

शेवटच्या दिवशी प्रभाग ११ (अ) मधून मालती तुकाराम म्हात्रे व प्रभाग ११ (ब) मधून स्मिता पांडुरंग माळी हे बिनविरोध निवडून आले आहेत. या अगोदर प्रभाग क्र.५ (ब) मधून दीपक जयवंत गुरव, प्रभाग ९ (अ) मधून वसुधा तुकाराम पाटील, प्रभाग १२ (अ) मधून सुशिला हरिश्चंद्र ठाकूर व प्रभाग १२ (ब) मधून अभिराज रमेश कडू हे बिनविरोध निवडून आले होते. खऱ्या अर्थाने या निवडणुकीत महायुतीने आघाडी घेतल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

## रोह्यात १९ जागांसाठी ५० उमेदवार

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. आतापर्यंत एकूण २० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने आता आता उर्वरित १९ जागांसाठी ५० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

थेट नगराध्यक्षपदासाठी एका उमेदवाराने अर्ज मागे घेतल्यानंतर आता थेट नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीच्या वनश्री शेडगे विरुद्ध शिवसेनेच्या शिल्पा धोत्रे अशी लढत होणार आहे.

नगरसेवकपदाच्या १९ जागांसाठी शिवसेना १३, राष्ट्रवादी काँग्रेस १९, काँग्रेस ५, शिवसेना उबाठा ४, भारतीय जनता पक्ष ३ आणि अपक्ष ६ हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्याने खऱ्या अर्थाने निवडणुकीला रंग चढणार आहे.

रोहा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असल्याने राष्ट्रवादीची ताकद आहे, तर अष्टमीमध्ये शिवसेना उबाठाचे वर्चस्व आहे. नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक १मध्ये अष्टमी कासर आळी, मराठा आळी, आंबेडकर नगर या परिसराचा समावेश आहे. प्रभागात पुरुष मतदार ९८४, स्त्री मतदार १०३२ असे एकूण २०१६ मतदार आहेत.

या मतदारसंघात मागील निवडणुकीत झालेल्या समीक्षा बामणे, नेहा पिंपळे या निवडून गेल्या होत्या.

या वेळी प्रभाग क्रमांक १ अ या जागेसाठी शिवसेना शिंदे गटाकडुन पूजा नितेश ऐनकर, राष्ट्रवादी काँग्रेसकडून निता महेश हजारे, काँग्रेसकडून मीना देवीदास जाधव निवडणूक लढवत आहेत. ब मधून अपक्ष म्हैसकर अब्दुल रज्ञाक मुश्ताक, शिवसेना शिंदे गटाकडून महेश मोहन बोथरे, काँग्रेसकडून विकास मारुती साळवी, राष्ट्रवादीच्या वतीने प्रशांत बंडू कडू, शिवसेना उबाठाकडून मनोज हरिश्चंद्र लांजेकर हे निवडणूक लढवत आहेत. ही निवडणूक राष्ट्रवादी पक्षाने प्रतिष्ठेची बनवली असून शिवसेनेच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादी आपली ताकद दाखवणार असल्याचे बोलले जात आहे.

## काकळच्या माजी सरपंच सरिता लाड भाजपमध्ये

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यात भाजपला जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अनेक जण विकासाच्या मुद्द्यावर भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघातील साई पंचायत समिती गणातील काकळ ग्रुप ग्रामपंचायत येथील माजी सरपंच सरिता लाड व ग्रामस्थांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

सरिता लाड त्यांच्यासमवेत ज्येष्ठ कार्यकर्ते वसंत रायाजी माने, अनंत रामभाऊ लाड, अल्पेश लाड, शैलेश लाड, इंद्रेश लाड, वैशाली माने, अश्विनी लाड, वर्षा लाड, ईश्वरी लाड, दीपक माने, दीपाली माने, प्रकाश माने, अनंत माने, अक्षय माने, सौरभ लाड, निलेश माने, नितीन माने, हरिश्चंद्र माने, मनोहर लाड, चेतन लाड, दीपेश लाड, पांडुरंग जाधव, मयूर जाधव, प्रथमेश जाधव, हरेश जाधव, नंदकिशोर कदम, सिद्धेश कदम, नयना कदम, राधिका कदम, हर्षदा जाधव, प्रभावती जाधव, रूपाली लाड, सुषमा लाड, वैशाली माने, नंदिनी माने, वंदना लाड, स्वाती लाड, लीलावती माने, नम्रता माने या ग्रामस्थांनी पक्षप्रवेश केला.

कार्यक्रमास युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, ज्येष्ठ नेते आनंद लाड, तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, सरचिटणीस किसन महाडिक, महादेव कदम, सचिन लाड, श्री. जाधव, उदय लाड व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे काकळ ग्रामपंचायतमध्ये भाजपचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे.



## निवडणूक कार्यालय उद्घाटनांद्वारे खोपोलीत महायुतीचे शक्तीप्रदर्शन



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद निवडणुकीत शिवसेना, भाजप व रिपाई महायुतीच्या निवडणूक प्रचार कार्यालयांचे उद्घाटन शुक्रवारी करण्यात आले. शिळफाटा, उदय विहार, कृष्णा नगर, मुगलवाडी लक्ष्मीनगर, मुख्य बाजारपेठ इत्यादी भागात या वेळी जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले.

खोपोलीत सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेना, भाजप, रिपाई अशी महायुती आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस, उबाठा व शेकाप परिवर्तन आघाडी करून निवडणूक लढवित आहेत.

दरम्यान कालच 'उबाठा'ने पत्रकार परिषद घेऊन राष्ट्रवादी आम्हाला विश्वासात घेत नसून परस्पर निर्णय घेतल्याचा गंभीर आरोप उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांनी केला. त्यामुळे आघाडीत खळबळ उडाली आहे.

महायुतीमध्ये तिकीट वाटपावरून दोन्ही पक्षातील नेते कार्यकर्त्यांची समजूत घालण्यात यशस्वी झाले असून आता महायुतीचा प्रचार एकोप्याने होणार असे सांगण्यात येत आहे.

खोपोली बाजारपेठेमध्ये तर संजय तन्ना व इंदरमल खंडेलवाल यांच्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी फटाक्यांची आतषबाजी व ढोल ताशांचा गजर करण्यात आला. स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप जिल्हा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस प्रकाश बेनेदार, प्रभारी सुनील घरत, स्थानिक निवडणूक प्रमुख यशवंत साबळे, भाजप शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी अत्रे, शिवसेना शहरप्रमुख संदीप पाटील, तालुकाप्रमुख संदेश पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उशिरा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी आमदार महेंद्र थोरवे व आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन केले.

## श्रीवर्धन उबाठा उपतालुकाप्रमुख जुनेद दुस्ते राष्ट्रवादीत

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झालेली असताना व आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी शिवसेना उबाठा गटाला जोरदार धक्का दिला आहे. उपतालुकाप्रमुख जुनेद दुस्ते व कार्यकर्ते शोएब हमदुले यांच्यासह श्रीवर्धन येथील मुस्लिम मोहल्ल्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.



श्रीवर्धन पालिकेत चुरशीची लढत शिवसेना उबाठा गटाचे ॲड.अतुल चौगुले व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार जितेंद्र सातनाक यांच्यामध्ये होणार आहे. ॲड. अतुल चौगुले यांना उभे करण्यामागे जुनेद दुस्ते यांचा मोठा पाठिंबा होता, परंतु राष्ट्रवादी काँग्रेसने ऐन निवडणुकीत दुस्ते यांना राष्ट्रवादीत प्रवेश दिल्यामुळे 'उबाठा'ची परिस्थिती बदलण्याची शक्यता आहे.

ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदार सुनील तटकरे यांनी जोरदार खेळी खेळून जुनेद दुस्ते यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात घेतले आहे. दुस्ते यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशामुळे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र सातनाक यांना फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

## महाड राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षपदी पूजा जगताप

**महाड : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशाने रायगड जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष उमा मुंडे यांनी महाड अध्यक्षपदी पूजा मंगेश जगताप यांची नियुक्ती केली. हे नियुक्तीपत्र महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांच्या हस्ते देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस हनुमंत (नाना) जगताप यांनी पूजा जगताप यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महाड विधानसभा महिला अध्यक्ष निता शेठ, माजी जिल्हा परिषद सदस्य अपर्णा जाधव व महिला पदाधिकारी उपस्थित होते



नगर परिषदचा निवडणूक प्रचार शिगेला पोहचला असून पक्षाचे महिलांबाबतचे उपक्रम,

ध्येयधोरणे सर्व महिलावर्गापर्यंत पोहचविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगत नियुक्ती केल्याबदल जगताप यांनी खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, जिल्हाध्यक्ष मुंढे, स्नेहल जगताप यांचे आभार मानले.

